भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला, क्रमांक ११

# क ऱ्हा ड

संपादक व प्रकाशक

यशवंत राजाराम गुप्ते,

बी. ए., एम्. आर. ए. एस.,

माजी असि. सुप. फॉर एपिग्रफी, पंजाब व संयुक्तप्रांत यांतील हिंदु व बौद्ध इमारतींचे पुराण-वस्तु-संशोधन-खात्याचे माजी असिस्टंट सर्व्हेअर, केर्न रीचर्स इन्स्टिटयूट (लीडेन, हॉलंड) व भा. इ. सं. मं. (पुणें) या संस्थांचे सभासद.

[ सर्व हक्क संपादक व प्रकाशक यांनीं स्वाधीन ठेविले आहेत. ]

सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी.

१९२२.

किंमत ८ आणे.

प्रकाशक
**यशवंत राजाराम गुळे**
(ता. खेड, जिल्हा पुणें), घर नं. १५१.

[ हें पुस्तक प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें आस्थापूर्वक अध्ययन करणारांस प्रेमपूर्वक अर्पण केलें आहे.]

मुद्रक
**अनंत सखाराम गोखले,**
'विजय' प्रेस, ५६४ शनिवार, पुणें.

# प्रथमावृत्तीचे प्रास्ताविक चार शब्द.

" दक्षिण काशी " संबोधिल्या जाणाऱ्या या श्रीक्षेत्र कऱ्हाडास कांहीं दिवस आमचें वास्तव्य झाल्यामुळें, हें सातारा जिल्ह्यांतील अत्यंत प्राचीन शहर असल्यामुळें व येथें बौद्ध, मुसलमानी आणि हिंदु इमारतींचे अवशेषहि बरेच असल्यामुळें, येथील माहिती थोडक्यांत संग्रहित करावी अशी आम्हांस प्रबल इच्छा झाली होती. मे० एम्. वेबू साहेब, आय्. सी. एस्., कलेक्टर व डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, सातारा, यांचा मुक्काम येथें असतां यांनीं " आम्ही पुढील खेपेस येथें येऊं तोंपर्यंत कऱ्हाडवर एक टिपण करून ठेवावें " असें आम्हांस सांगितलें. आमचे मित्र पुराण-वस्तु-संशोधन-खात्याचे सुपरिंटेंडेन्ट रा० का. ना. दीक्षित, एम्. ए., यांनीं ते अगाशिवाचीं लेणीं तपासावयास आले तेव्हां " Karhad and its Antiquities " वर कांहीं लिहा म्हणून आग्रह केला. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या चवदाव्या वार्षिक संमेलनासाठीं आमच्याकडे निबंध मागण्यांत आला. तेव्हां आम्हीं कऱ्हाडची माहिती ( विशेषेंकरून ऐतिहासिक-दृष्ट्या ) थोडक्यांत लिहून काढून ती या संस्थेकडे पाठविली. ती हिच्या शके १८४७ च्या त्रैमासिकांत प्रसिद्ध करण्यांत आली. तीच पुस्तकरूपानें अल्प किंमतींत कऱ्हाडकरांस, सातारकरांस व इतरांस मिळेल तर त्यांस अत्यंत सोईचें होऊन आणखी ऐतिहासिक सामुग्री जमविण्यास मोठी मदत होईल अशा सूचना आमच्या हिंदु व मुसलमान मित्रांनीं आम्हांस केल्या. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे चिटणीस प्रो० द. वा. पोतदार, बी. ए., यांस विचारितां प्रस्तुत लेख मंडळाच्या पुरस्कृत–ग्रंथमालेचा अकरावा क्रमांक म्हणून छापावा अशी त्यांनीं अपेक्षा केली. आम्हीहि मंडळाचे सभासद आहोंत. तेव्हां आम्हांसहि दुधांत साखर घातल्याप्रमाणें वाटलें. पुरस्कृत-ग्रंथमालेंत हा लहानसा लेख गोंवून मंडळानें आपला मार्मिकपणा व्यक्त केल्या-बद्दल त्याचे आम्ही आभारी आहोंत.

वरील इच्छा व अपेक्षा यांचें मूर्तस्वरूप ह्या लेखाचें स्वतंत्र प्रकाशन

होय. हा पुष्कळ वाढवून लिहितां आला असता. पण तसें करण्यानें ह्याचें मूल्य वाढलें असतें. आज विद्येची अभिरुचि असणाऱ्या बहुतेक लोकांची ऐपत बेताचीच असते. तथापि त्यांसच संग्रह करावासा वाटतो असा अनुभव आहे. ह्या आवृत्तीचे खपावरून पुढील अंदाज करितां येईल व लोकांस आवडल्यास कांहीं बाबींचें विस्तृत विवेचन पुढें करितां येईल. वास्तविक पाहतां उपलब्ध झालेली सर्व माहिती लेखांत फार थोडक्यांत आणलेली आहे. तींतील बरीच अगदीं नवीन आहे हें सांगावयास नकोच. या लेखाचीं छायाचित्रें, प्लॅन वगैरे घालून वाढविलेली इंग्रजी आवृत्ति फुरसतीअंतीं प्रकाशण्याचा विचार आहे. त्यास परमेश्वर मूर्तस्वरूप देईल तो सुदिन होय !

नासिक जिल्ह्यांतील ऐतिहासिक व पुराण-वस्तु-संशोधनाविषयींचीं आमचीं टिपणें मुंबई सरकारनें मे० सी. एम्. बेकर, आय्. सी. एस्., यांचे सूचनेवरून नासिक गॅझीटीअरचे दुरुस्तीच्या वेळीं त्यांत समाविष्ट करण्यासाठीं दप्तरीं दाखल केलीं आहेत. त्याप्रमाणेंच सातारा गॅझीटीअरचे दुरुस्तीस प्रस्तुत लेखाचा उपयोग होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

ह्या लेखाचे प्रकाशनास ताबडतोब परवानगी देऊन मे० एफ्. जी. एच्. अंडरसन साहेब बहादुर, एम्. ए., आय्. सी. एस्., इ. ज. ऑफ् रेजिस्ट्रेशन व मे० जे. पी. ब्रॅन्डर साहेब बहादुर, एम्. ए., आय्. सी. एस्., जे. पी., डि. र., सातारा, यांनीं आम्हांस उपकृत केलें यास्तव त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानितों. हा लवकर छापून दिल्याबद्दल रा० अ. वि. पटवर्धन स्तुतीस पात्र आहेत.

कऱ्हाड<br>ता. १-४-१९२७

यशवंत राजाराम गुप्ते.

# पुरस्कार.

श्री० यशवंतराव गुप्ते, बी.ए., एम्.आर.ए.एस्., या संशोधकांनीं लिहिलेलें कऱ्हाडच्या माहितीचें हें छोटें पुस्तक भा०इ०सं०मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत गोंवण्याची संधि रा० गुप्ते यांनीं आम्हांस दिली यास्तव आम्ही मंडळातर्फे त्यांचे आभारी आहों. हें छोटें पुस्तक आश्रय मिळाल्यास पुढें वाढविण्याचा हेतु आहे. अशीं स्थलवर्णनात्मक पुस्तकें आपल्या इकडे थोडींच आहेत. नवीन लोकलबोर्ड, म्युनिसिपॅलिट्या, देवस्थानपंच इत्यादींनीं असलीं पुस्तकें, प्रस्तुत लेखांत घातली आहे तशा प्रकारची विश्वसनीय माहिती अधिकारी लेखकांकडून देववून प्रसिद्ध करविणें व त्यांस उदार आश्रय देणें हीं त्यांचीं महत्त्वाचीं कर्तव्यें होत. रा० गुप्ते यांचा हा प्रयत्न फार उपयुक्त आहे. अशा सर्व प्रयत्नांस मंडळाकडून शक्य तें उत्तेजन मिळेल.

पुणें,
नागषष्ठी–१८४८.

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस, भा०इ०सं०मंडळ, पुणें.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

आमची बदली पुनरपि कऱ्हाडास झाली, त्या अवधींत संशोधनासहि बराच वाव मिळाला. तेथील लेण्यांत वारंवार सुटींत वगैरे जाऊन आम्हीं स्वतःच्या कॅमेऱ्यावर छायाचित्रेंहि ४०।५० घेतलीं. इतरत्रहि घेतलीं. साताऱ्यास यूनियन क्लबामार्फत तेथील कलेक्टर मे० ॲबॉटसाहेब, आय्. सी. एस्. यांच्या अध्यक्षतेखालीं ता. २९।१।२८ रोजीं आमच्या झालेल्या इंग्रजींतील व्याख्यानांत कऱ्हाडसंबंधीं कांहीं नवीन माहिती आम्हीं दिली. ती श्रोतृवृंदास पुष्कळ आवडली. ती सर्व सातारा जिल्ह्यांतील पुराणवस्तु व ऐतिहासिक संशोधनाबरोबर रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या मुंबईच्या शाखेच्या जरनलांत इंग्रजींत आली आहे.[1] पण वरील भाषण झाल्यावरहि आम्हीं केलेल्या संशोधनाचा पूर्वीच्या माहितीबरोबरच सारांश देणें इष्ट आहे.

या पुस्तकाची प्रथमावृत्ति मुंबई सरकारनें प्राथमिक शाळांच्या पुस्तकालयांस मेहेरबानीनें मंजूर केली. तथापि मंजुरी येण्याच्या सुमारास तिच्या बहुतेक प्रती जवळजवळ खलास झाल्या. इतर पुस्तकालयांच्या व विद्वज्जनांच्या दूरदूरच्या मागण्या येऊं लागल्या.

आमचे मित्र झीज सोसूनहि द्वितीयावृत्ति प्रसिद्ध करण्याविषयीं आग्रह करूं लागले. कऱ्हाडच्या व त्याच्या आसपासच्या प्रांतांच्या संबंधाचे आम्हांस उपलब्ध झालेल्या किमिया, औषधोपचार वगैरेवरील पोथींतील उतारे आम्हीं भा. इ. सं. मंडळाच्या १६व्या संमेलनांत वाचिले. हींतील एक अगदीं लहान उतारा उद्धृत करून त्याचें भाषांतर द्वितीयावृत्तींत दिलें आहे. या पोथीची प्रत रॉ. ए. सो. च्या मुंबईच्या शाखेंत, तसेंच मद्रासच्या पुस्तकालयांतहि नाहीं असें रा० ब० चिं. वि. वैद्य व डॉ० कृष्णस्वामी आयंगार यांजकडे आम्हीं चौकशी केली तीवरून दिसतें. तेव्हां पुस्तकांतील उताऱ्यावरून हिच्या प्रतीचा शोध करण्यास सोईचें होईल.

सुंदर छायाचित्रें नसल्यास पुस्तकास वैगुण्य येईल असें कांहीं मित्रांनीं

1. JBBRAS., N. S., Vol. IV, Nos. 1 & 2, pp. 81-94.

सांगितल्यावरून पूर्वींचीं सर्वच काढून आम्हीं स्वतः घेतलेल्या छायाचित्रांवरून टाइम्स प्रेसकडून नक्त उत्तम ब्लॉक करवून आणून त्यांवरून सोबतचीं नक्क छायाचित्रें छापवून घेतलीं आहेत.

पुस्तकांत कांहीं शब्दांविषयीं अनुकारिलेल्या नियमांबद्दल चार शब्द लिहिलेले बरे. " हि " व " ही " अशा देखील या अर्थाच्या उभयान्वयीच्या लिहिण्याच्या पद्धति आहेत. " हि " संस्कृतवरून आल्यामुळें ऱ्हस्वच ठेविणें युक्त होय. तसेंच छत्रपति, कालावधि, मूर्ति, आकृति, पुष्टि, परिस्थिति, समाधि, सहानुभूति, कीर्ति, आवृत्ति, प्रतिनिधि, अभिरुचि, वृष्टि, निधि, स्तुति वगैरे संस्कृतांतील शब्द मराठींत घेतांना दीर्घ करितात किंवा तसेच ठेवितात. ते दीर्घ करण्याचें मुख्य कारण असें देण्यांत येतें कीं, मराठींत या शब्दांचा उच्चार आपण तसा करितों; पण हें विधान समाधानकारक नाहीं. कोणी दीर्घ उच्चार करितात तर कांहीं ऱ्हस्व करितात. तेव्हां संस्कृत ही मातृभाषा असल्यामुळें मूळचेच शब्द वापरणें इष्ट दिसतें. पण त्यांस विभक्तीचे प्रत्यक्ष " स ", " चा " वगैरे प्रत्यय लावून त्यांचीं निराळीं रूपें केल्यास " इ " कार अथवा " उ " कार दीर्घ करणें इष्ट दिसतें; उदाहरणार्थ—स्तुतीस, आवृत्तीचीं, आकृतीशीं, प्रतिनिधींचे, प्रसिद्धीचा, गणपतीच्या वगैरे. मूळ दोन अथवा अधिक संस्कृत शब्दांचे संधि करून ते मराठींत आणिल्यास मूळ संस्कृतांतीलच नियम पाळणें युक्त होय.

ज्या विद्वज्जनांनीं या द्वितीयावृत्तीचें हस्तलिखित वाचून पाहिलें, त्यांनीं असे उद्गार काढिले कीं, हींत इतक्या नवीन संशोधनाचा सारांश आला आहे व हींत इतकी नवीन माहिती दिली आहे कीं, ही प्रथमावृत्तीचीच दुसरी आवृत्ति आहे किंवा काय याविषयीं संशय उत्पन्न झाला. याचें बहुतेक श्रेय प्रथमावृत्तीच्या प्रती विकत घेणाऱ्या गुणग्राही वाचकांसच आहे.

या आवृत्तीची रचना अशी केली आहे कीं, शिक्षक, विद्यार्थी, संशोधक, व्यापारी, प्रवासी व सर्वसाधारण वाचक या सर्वांसच ही विशेष उपयुक्त व चित्ताकर्षक होऊन त्यांस इ० सनापूर्वी २००–२५० पासून आज तागाईत

सर्व तऱ्हेची कऱ्हाडची माहिती मिळावी. संशोधकांच्या सोईसाठीं पादटीपांतून मुद्दाम सविस्तर आधार वगैरे दिलेले आहेत.

सातारचे विद्वान् हायकोर्ट वकील रा० वि. स. बखले, एम्. ए., एल्. एल्. बी., रा० ब० चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए., एल्. एल्. बी., डॉ० व्ही. एस्. सुकठणकर, एम्. ए., पी. एच्. डी., कलकत्त्याचे पुराण-वस्तु-संशोधन खात्याचे सुपरिंटेंडेंट रा० का. ना. दीक्षित, एम्. ए., मुंबईच्या प्रिन्स ऑफ् वेल्स अजाबघराचे क्यूरेटर, रा० जी. व्ही. आचार्य, बी. ए., एम्. आर. ए. एस्. व राजकोटच्या वॅटसन अजाबघराचे क्यूरेटर, रा० द. बा. डिस्कळकर, एम्. ए., यांनीं आम्हांस लागलीं तीं पुस्तकें, त्यांतील उतारे पाठवून व वेळीं कांहीं सूचनाहि करून जें साहाय्य केलें त्याबद्दल आम्हीं त्यांचे फार फार आभार मानितों.

कार्यबाहुल्यामुळें प्रूफें परत करण्यास विलंब लागला. तरी आपल्या छापखान्याची गैरसोय करून रा० अ. स. गोखले यांनीं प्रस्तुत आवृत्ति मुद्रित करून दिली, यास्तव त्यांचेहि आम्ही आभारी आहों.

मुंबई सरकार ही सर्व शाळांसाठीं व बक्षिसांसाठीं मंजूर करील व विश्वविद्यालयें, संशोधक, विद्वज्जन व सर्व वाचक आपला उदार आश्रय कायम ठेवितील, एवढेंच नव्हे तर अधिक देऊन तृतीयावृत्तीचे प्रकाशनास मदत करतील, अशी दृढ आशा करून हा प्रास्ताविक लेख संपवितों.

खेड,
ता. १।४।२९.

यशवंत राजाराम गुप्ते.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठें |
|---|---|
| नांव | १–३ |
| प्राचीन शिलालेखांतील उतारे | ३–४ |
| प्राचीन अवशेष | ५–२० |
| १ बौद्धकालीन | ५–९ |
| २ जैन | ९ |
| ३ हिंदु | ९–१६ |
| ४ मुसलमानी | १६–२० |
| व्याप, विस्तार, व्यापार व त्यांचें स्थित्यंतर | २०–२३ |
| इतिहास, धार्मिक देणग्या, व्यापार, राहणी वगैरे | २३–५० |
| १ प्राचीन | २३–४१ |
| २ मुसलमानी अमदानी | ४१–४३ |
| ३ मराठ्यांचा अम्मल | ४३–४८ |
| ४ इंग्रजी अमदानी | ४८–५० |
| साध्वी स्त्रिया | ५०–५१ |
| कांहीं ऐतिहासिक घराणीं | ५१–५८ |
| १ हिंदु कुलें | ५१–५३ |
| २ मुसलमानी घराणीं | ५३–५८ |

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| १ | ( मळपृष्ठाचे आंतील पृष्ठ) | —संशोघक— | —संशोधक— |
| ५ | ४ | जखिणवार्डीचीं | जखिणवाडीचीं |
| ८ | ५ | कृष्णेच्या कांठच्या | करा(ऱ्हा)ड जवळील कृष्णेच्या कांठच्या |
| १० | ६ | लण्यांतून | लेण्यांतून |
| १२ | १७ | गणपती | गणपति |
| ,, | १९ | घरात | घरांत |
| १८ | २३ | Pillas | Pillar |
| २१ | १३ | जाणे | जाणें |
| २२ | ६ | अंधकाराचा | अंधःकाराचा |
| २३ | ९ | जाम–इ मसजिदीचा | जाम–इ–मसजिदीचा |
| २५ | १० | विशेषणांवरून | विशेषणावरून |
| ,, | १८ | प्रयवाय | प्रत्यवाय |
| ,, | २२ | यांच | यांचें |
| २६ | ३ | गोंवाऱ्यांस | गोंवाऱ्यास |
| ,, | १८ | अंधकाराच्या | अंधःकाराच्या |
| २७ | ४ | ( कृष्णा–वेण्णा[1]) | ( कृष्णा–वेण्णा ) |
| ,, | १२ | आहे.[2] | आहे[1]. |
| २८ | ८ | ईशानाशिवाचा | ईशानशिवाचा |
| २९ | १६ | मराठ | मराठे |
| ३२ | २ | यांस | यास |
| ,, | १२ | दारिद्र | दारिद्य |
| ३६ | २४ | कारहाटकं | करहाटकं |
| ३७ | १८ | पृष्ठ | पृष्ठें |
| ,, | २८ | ecognized. | recognized. |
| ३९ | १३ | प्रश्न आहे | प्रश्न आहे. |
| ,, | २३ | सामज्यांत | साम्राज्यांत |
| ४७ | ५ | सांभळिलेली | सांभाळिलेली |
| ५० | २ | हिंदु | हिंदु |
| ,, | १७ | पुण्यस्थानांचें | पुण्यस्थानांचें |
| ५२ | २३ | वर्ष | वर्षे |

# क ऱ्हा ड [1]

सातारा जिल्ह्यांत ज्या ठिकाणीं सर्वांत प्राचीन अवशेष पुराव्यास दत्त म्हणून उभे आहेत असें शहर कऱ्हाड होय. हल्लीं सातारा जिल्ह्याचें केंद्र तर तें आहेच. पुरातन काळीं तो जिल्हाच होता. त्या शहरास मोटारींमुळेंच एवढें महत्त्व आलें आहे असें नाहीं. कुंभारली घाटांतून कोंकणांत पाटणच्या बाजूनें उतरण्याचा रस्ता तोच होता. पुण्याचे बाजूस तेथूनच जात. बेळगांव-ची वाट तीच. सांगण्याचा उद्देश हा कीं, कऱ्हाडास कैक वर्षांपासून स्वाभाविक महत्त्व आहे, आजकाल आलेलें नाहीं.

---

## नांव

कऱ्हाड हें नांव कसें पडलें हा एक मोठा वादग्रस्त मुद्दा आहे. भरूतचे लेखांत 'करहकट' व कुड्याचे लेण्यांतील लेखांत (इ. सनापूर्वी २००—इ. सनानंतर १००)[2] 'करहाकडक' अशीं नांवें आलेलीं आहेत. मागचीं अक्षरें पुढें व पुढचीं मागें झाल्याचीं उदाहरणें आहेत. बनारस नांव वाराणसीचें

---

१. कऱ्हाडावरील लेख भा. इ. सं. मंडळाच्या १४ व्या वार्षिक संमेलनांत वाचण्यांत आला. त्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली ती प्रथमावृत्तींत समाविष्ट केली. त्यानंतर प्राचीन ग्रंथांतून उल्लेख सांपडले. संशोधनहि बरेंच झालें. या सर्वांचा फक्त सारांश या आवृत्तींत दिला आहे. पुढें प्रसिद्ध व्हावयाच्या इंग्रजी चोपड्यांत व या पुस्तकाची तृतीयावृत्ति निघाल्यास तींत अधिक छायाचित्रें, प्लॅन वगैरे देतां येतील. अधिक विस्तृत माहितीहि जमल्यास अवश्य देऊं.

२. मुंबई गॅझीटीअर सातारा, पृष्ठ ४८०. Dynasties of the Kanarese Districts of the Bombay Presidency, वर दोन्ही ठिकाणचे लेखांत 'करहाकड' असल्याचें लिहिलें आहे. पण कुड्याचे लेखांत 'करहाकडक' असून भरूतचे लेखांत 'करहकट' आहे.

अपभ्रष्ट रूप आहे हें निर्विवाद होय. म्हणजे 'न' व 'र' मागेंपुढें झाले. तेव्हां करहाकडचें करहाडक होणें स्वाभाविकच होय. 'र'चा 'ड' व 'ड'चा 'र' तर नेहमींच होतो. शिवाय 'करहाटक', 'करहाट', 'करहाड' आणि 'करहड' अशीं त्या गांवाचीं रूपें ताम्रपटांत, शिलालेखांत व महाभारतांत आलेलीं आहेत हें विश्रुतच आहे. 'कट' याचा अर्थ कंबरपट्टा व नंतर लगतची दरी, सपाट प्रदेश, गांव असा होतो. करहाकट, करहाकड म्हणजे करहेच्या लगतची दरी; किंवा सपाट मुलूख. आतां ती नदी कोणती एवढाच प्रश्न राहातो. 'कऱ्हा' तर तेथें नाहीं. नाहींतर कऱ्हाटक होणें साहजिक होतें. पुणें जिल्ह्यांत 'कऱ्हा' आहे. पण सातारा जिल्ह्यांतील पाटण तालुक्यांत 'केरा' आहे. तिचें मूळचें नांव नक्की काय होतें तें कळण्यास मार्ग नाहीं. ती पाटणनजीक कोयनेस मिळते. संगमापुढें पाटणापासून पुढें 'कोयना' असेंच नांव प्रचलित आहे. कऱ्हाडास कृष्णेपेक्षां कोयनेचेंच पात्र मोठें आहे. खोडशीचें धरणामुळें तर कृष्णेचें पात्र अधिकच आकुंचित झालें आहे. तरीहि कऱ्हाडचे पुढें नदीस 'कृष्णा' म्हणतात. यावरून पुरातन काळीं कोयनेस व कृष्णेस 'केरा'च संबोधित असल्यास नवल नाहीं. केरेचें प्राचीन नांव 'करहा' अथवा 'कऱ्हा'हि कदाचित् असेल. करहा हें त्या वेळचें प्राकृत रूप असेल. नाहींतर नदीचें नांव जवळ जवळ याच उच्चाराचें असेल. एकूण सांगावयाचें इतकेंच कीं, केरा, करहा, कऱ्हा, यांचा कट यावरून त्या शहराचें कऱ्हाड नांव रूढ होणें संभवनीय आहे. दुसरी एक व्युत्पत्ति शक्य आहे ती अशी:— हट्=प्रकाशणें. हाटक=सोनें. हट=बाजार. हटचें प्राकृत रूप अर्थात् हाट होईल. केरेच्या, करहेच्या, कऱ्हेच्या ठिकाणचें सोनें, सोन्यासारखें गांव किंवा बाजारचें गांव कऱ्हाड.[1] आसमंतांतील प्रदेशाच्या मध्यावर असल्यामुळें

---

१. राजकोटच्या वॅटसन अजायबघराचे क्यूरेटर रा० डिसकळकर, एम्. ए., म्हणतातः—"तेव्हां बहुतकरून कऱ्हा नदीच्या कांठचा हाट म्हणजे बाजाराचें गांव म्हणजे मोठें शहर असा एक अर्थ रा० गुप्त्यांनीं केला आहे तो बरोबर असावा. तथापि कऱ्हा+आहार म्हणजे कऱ्हा नदीच्या कांठचा आहार म्हणजे प्रांत. जसें, वर्धा+आहार=वऱ्हाड असा अर्थ केल्यास अधिक युक्त होईल असें वाटतें. कोयना नदीचें पूर्वीचें नांव कऱ्हा असावें."

—सह्यविचार, वर्ष ६, अंक ३, डिसेंबर १९२७, पृष्ठ १४१.

बाजारचें मुख्य ठिकाण तेंच असलें पाहिजे. 'करहाकटक' याची व्युत्पत्ति करहेच्या कांठचें सैन्य उतरण्याचें स्थान अशी दाखवितां येईल. परंतु हाटकेश्वर वगैरे स्थानें कऱ्हाडास असल्यामुळें ही फारशी संभवनीय वाटत नाहीं. कऱ्हा+आहार ही व्युत्पत्ति बरोबर दिसत नाहीं. आपल्या डोळ्यांपुढें 'कऱ्हाड' एवढाच शब्द असता तर ही कल्पना करण्यास थोडी जागा होती. तथापि करहकट, करहाकटक, करहाकडक, करहड वगैरे रूपें प्राचीन लेखांत व ग्रंथांत येतात हें विसरतां कामा नये. तेव्हां कऱ्हाड याची व्युत्पत्ति वरील रूपांवरूनच लावणें भाग आहे. कऱ्हेचा आहार मानण्यास अवसर नाहीं.

---

## इ० सनपूर्वींच्या वरील शिलालेखांत आलेले

# कऱ्हाडसंबंधींचे उतारे

### १. भरुतचे लेख

खालील भरुत येथील लेख इ० सनापूर्वी ३०० ते २००चे आहेत असें विद्वानांचें मत आहे. आमच्या मतें ते इ० सन २०० पासून २५०चे आहेत.

लेखांक २१[1]. करहकट–अय–भुतकस[2] थभो [२४][3] दानं म्हणजे करहकटचा आर्यभूतक याची देणगी हा स्तंभ (खांब) [होय].

लेखांक २४. करहकटा समिकस दानं थभो[4] [२७] म्हणजे हा स्तंभ (खांब) करहकटचा राहाणारा समिक (श्यामक) याची देणगी [होय].

लेखांक ४३. करहकट–उतरगिधिकस थभो दानं[5] [४६] म्हणजे हा स्तंभ (खांब) करहकटचा उतरगिधिक (उत्तरगृध्रक) याची देणगी [होय].

---

1. Barhut Inscriptions by B. Barua, M. A., D. Lit. and Kumar Ganganand Sinha, M. A., p. 11.
2. Barua's Special numbering for each group.
3. Barua's continuous numbering to facilitate reference.
4. Ibid, p. 17. 5 Ibid, p. 33.

लेखांक १७. (२) करहकट—निगमस दानं[1] [११९] म्हणजे करहकटच्या शहराची अथवा करहकटच्या नैगमाची (नैगम नांवाच्या व्यापाऱ्याची) अथवा निगम सभेची [ही] देणगी [होय].

लेखांक ७. [कर] हकटिकाया[2] [दानं] [१२६] म्हणजे करहकटच्या राहणारणीची देणगी.

## २. कुड्याचे लेण्यांतील लेख

लेखांक १८. करहाकडकस लोहवाणियियस महिकस देयधंमं लेणं [।।] म्हणजे करहाकडचा राहाणारा लोखंडाचा व्यापारी महिक याचा दानधर्म हें लेणें होय.

"क"चा अर्थ वर आजपर्यंत जाडचा विद्वानांनीं केला आहे त्याप्रमाणें म्हणजे "चा राहणारा" असा केला आहे.

पण बेनाकटक[3] म्हणजे बेणेच्या, वेणेच्या, वेण्णेच्या आसपासचा प्रांत अथवा गांव होणें जसें संभवनीय आहे, तद्वत् "करहाकडक"="करहाकटक" म्हणजे करहेच्या वगैरे आसपासचा प्रांत, शहर होणें असंभवनीय नाहीं.

तेव्हां कऱ्हाडचें नांव या लेखांत "करहाकड" असेल किंवा "करहाकडक"हि होईल. करहाकडकचें थोडक्यांत उच्चारावयाचें रूप (dimunitive) "करहाकड" होईल. साम्यतेसाठीं पुढील काळांतील आधार देतां येईल. श्रावण-बेळू[4]-गोळच्या लेखांत "करहाकटक" रूप आलें आहे तर दावणगेरेच्या[5] लेखांत "करहाट" आहे.


प्रस्तुत लेखावरून इ०सनापूर्वी २ऱ्या ते ३ऱ्या शतकांत कऱ्हाडास लोखंडाचा व्यापार चाले हें उघड दिसतें.

---

१. बरुआ व सिंह, [कर] हकटिकाय [दानं] असें वाचितात. p. 36.
2. ASWI, Vol IV, pp. 84 ff.
3. Cf. V. S. Bakhle, M. A., LL. B., JBBRAS., N. S. Vol. III, No. 1, p. 88.
4. Ep. Ind. Vol. III pp. 194-195.
5. Ep. Carn. Vol XI p. 92.




१. त्रिरत्न असलेलें जखिणवाडी येथील लेणें, क्रमांक ६. पृष्ठ ५.




२. दागोबा व छत्री असलेलें जखिणवाडी येथील लेणें, क्रमांक १२. पृष्ठ ६.



३. कोयनेकडे तोंड असलेल्या लेण्यांतील मूर्ति. पृष्ठें ६ व २४.



४. लेण्यांतील त्रुटित लेख. पृष्ठ ७.



५. श्रीकृष्णा-ककुद्मती-प्रीति-संगम. पृष्ठ ५.

# कऱ्हाड येथील प्राचीन अवशेष

## १. बौद्धकालीन

कऱ्हाडचे आसपासचे सर्वांत प्राचीन अवशेष म्हटले म्हणजे ज्यांस अगाशिवाचीं व जखिणवाडींचीं लेणीं म्हणतात ते होत. अगाशिव हा शब्द अग्रे शिवः यस्य [ स पर्वतः ] म्हणजे ज्या पर्वताच्या शिखरावर शिव आहे [ तो पर्वत ] यापासून झाला असावा. "अग्र" म्हणजे "टोंक". ज्या टेंकडीवर तीं लेणीं आहेत तिच्या अगदीं उच्च शिखरावर शिवाचें देवालय आहे. त्यावरून हें नांव पडलेलें दिसतें. पण तीं लेणीं ब्राह्मणधर्माचीं नसून अगदीं प्राचीन बौद्धधर्माचीं आहेत. अर्थात् वरील शिवालय बरेंच अलीकडचें आहे.

"जखिणवाडी" हा "यक्षिणवाटिका" या शब्दाचा उघड अपभ्रंश आहे. बौद्धधर्मांत 'यक्ष' व "यक्षिणी" यांचें अस्तित्व प्रामुख्यानें मानीत. नासिकच्या लेण्यांतून वगैरे त्यांच्या प्रतिमाहि कोरिलेल्या आहेत.

वर निर्दिष्ट केलेलीं लेणीं ६४ वर आहेत. सूक्ष्म दृष्टीनें तीं पाहाण्यासाठीं त्यांचे तीन भाग करितां येतात. कऱ्हाडाहून निघून पहिल्या दिवशीं कोयनेच्या बाजूस तोंड असलेलीं लेणीं पाहावीं. सुमारें तीन मैल गेल्यावर चढ लागतो. कऱ्हाड-कोल्हापूर रस्त्यापासून, कऱ्हाड–कोळें रस्त्यानें गेलें म्हणजे सुमारें एक मैलावर तो लागतो. चचेगांवचे ओढ्यापासूनहि वर होतां येतें. पण त्यापूर्वींच दोन फर्लांगापासून वर जाणें चांगलें. दुसऱ्या दिवशीं जखिणवाडी गांवांतून बहिरव दऱ्यांत शिरावें. त्या दऱ्यांतून लेण्यांस जावयास ओबडधोबड दगड लावून साधारण पायऱ्या केलेल्या आहेत. त्यामुळें त्यांतून जाण्याचा रस्ता सुगम झाला आहे. "बहिरव दरा" व "बहिरव लेणीं" अशीं नांवें पडण्याचें कारण असें आहे कीं, तेथील प्राचीन बौद्धांच्या लेण्यांत हल्लीं बहिरवाचें स्थान आहे. पूर्वींच्या लेण्याचा कांहीं भाग फोडून तेथें बहिरवाची स्थापना केलेली आहे. द्वाराचे दोन्ही बाजूस मूर्ति बसविल्या आहेत. प्रेक्षकांच्या डाव्या हातास एक शंकराची पिंडी खोदिलेली आहे. लेण्यांत खिडक्या आहेत.

बहिरव लेण्याकडे तोंड केल्यास उजव्या हातास जीं लेणीं आहेत तीं पाहणें दुर्घट आहे. पण त्यांतूनच सुबक खिडक्या वगैरे कोरलेल्या आहेत. हिंय्या करून वानरासारखें जाऊं म्हटल्यास तीं पाहातां येतात!

तिसऱ्या दिवशीं जखिणवाडीचीं लेणीं पाहावींत. तीं गांवापासून सुमारें १॥–२ मैल आहेत. गांवापासून मैलभर गेल्यावर चढ लागतो. खालचा स्वल्प आहे; तथापि वरचा कांहींसा कठीण आहे. तो ओलांडला म्हणजे लेणीं लागतात. त्यांतील एकाच्या ( लेणें क्रमांक ६च्या ) एका बाजूस चक्र, दुसऱ्या बाजूस सिंह व आंत दागोबा आहे [छायाचित्र क्रमांक १ पाहा.]

कऱ्हाडचीं सर्व लेणीं हीनयान पंथाचीं आहेत. या पंथांत बुद्धाची प्रत्यक्ष मूर्ति पूजीत नसत. दागोबा त्याचा निदर्शक असे. चक्र, धर्मचक्राची खूण काढीत. सिंह बौद्धधर्मीय संघाचा द्योतक असे. या त्रयीस बौद्धधर्मोचें त्रिरत्न संबोधितात. याची कल्पना यावी म्हणूनच वरील छायाचित्र दिलें आहे. दागोबाच्यावर छत्री असे. ती दिसावी म्हणून जखिणवाडीच्या दुसऱ्या एका ( लेणें क्रमांक १२च्या ) लेण्यांतील दागोबा व छत्री दिसेल असेंहि छायाचित्र [ क्रमांक २ ] दिलें आहे.

पुढें पांचव्या, सहाव्या शतकापासून महायान पंथास महत्त्व येऊन बुद्धाच्या विपुल मूर्ति कोरून त्यांची पूजा करूं लागले. पण आपणांस त्यांच्याशीं तूर्त कांहीं कर्तव्य नाहीं.

प्रस्तुत कऱ्हाडचीं लेणीं हीनयान पंथाच्या पूर्वकालांतील आहेत. मुंबई गॅझीटीअर सातारा– पृष्ठ ४७७वर हीं इ० सनानंतरच्या पहिल्या दुसऱ्या शतकांतील होत असें प्रतिपादिलें आहे. गॅझीटीअरें लिहिलीं तेव्हां प्राचीन अवशेषांचा आजच्या एवढ्या सूक्ष्म रीतीनें अभ्यास करण्याचीं साधनें उपलब्ध नव्हतीं. हल्लीं तो मनु पालटला आहे. लेण्यांतील एक मूर्ति व एक लेख नीट तपासल्यास त्यांचा काल निश्चित करण्यास बराच वाव मिळतो. मूर्ति असलेल्या भागाचें छायाचित्र सोबत आहे. [क्रमांक ३ पाहा] मनुष्याची आकृति भरुतच्या आकृतीशीं बरीच जमते. लेण्यांत दोन लेख आहेत. ते त्यांवरून पाणी वाहून वाहून,

त्यांस हवा लागून व खडकाच्या ढिसूळपणामुळें अगदीं अस्पष्ट झालेले आहेत. साधारणपणें छायाचित्रांपेक्षां लेखांचे ठसे अधिक चांगले निघतात. पण तेथें प्रकार उलटाच आहे! तसल्या ठिकाणीं कॅमेरा लावणें दुर्घट होतें. पण मित्र-मंडळीच्या साहाय्यानें दगड, लांकडें वगैरे जमवून आम्हीं छायाचित्रें घेतलीं. ठसेहि घेतले. एक लेख खराब झालेला व समग्र आहे. तो असा:— "गोपालपुतस संघमितरस लेण देयधम"[1] म्हणजे गोपालाचा पुत्र संघमित्र याची धार्मिक देणगी अथवा याचा दानधर्म हें लेणें होय. गॅझीटीअरकारांच्या मतें वरील लेख इ०सनानंतरच्या पहिल्या शतकांतील आहे.[2] फर्ग्युसनसाहेबांनीं तो इ०सनापूर्वीचा आहे असें विधान केलें आहे.[3] आमचें मत वरीलप्रमाणें आहे. त्यास हिंदुस्थानांतील व युरोपांतील कांहीं विद्वानांचा दुजोरा आहे. दुसरा लेख त्रुटित असून इतरत्र प्रसिद्ध झालेला नाहीं. सबब त्याचें छायाचित्र [क्रमांक ४] देत आहोंत. तो असा:—ध्र [?] मरखितस देय [धम]=धर्मरक्षितस्य देयधर्मं म्हणजे धर्मरक्षिताची देणगी. पहिलीं अक्षरें गेल्यामुळें नांव काय होतें हें खात्रीनें सांगतां येत नाहीं.

या लेखाचा काल पहिल्याच्या थोडासा मागाहूनचा असणें अ-संभवनीय नाहीं. तरी पण या दोहोंच्या कालांतील अंतर १५०।२०० वर्षांपेक्षां जास्त असणार नाहीं. पहिल्या लेखांतील बहुतेक अक्षरें अशोकाच्या शासनांच्या धर्तीचींच आहेत. दुसऱ्यांतील "र" इ० सनानंतरच्या पहिल्या शतकांतील अथवा दुसऱ्या शतकाच्या पूर्वार्धांतील असणें शक्य आहे. तरी इसवी सनानंतर १२५–१५० च्या पुढें या लेखाचा काल जाणार नाहीं. लेण्यांतील निजावयाच्या दगडी बांकावरून, चैत्याच्या आकारावरून, खांबावरून वगैरे तीं याच कालांतील असावीतसें दिसतें. वरील मूर्तीवरून तिच्या पोषाखावरून व तदनंतरच्या खोदकामावरून या विधानांस पुष्टि येते.

क्षत्रप बौद्धधर्मी असत. त्यांचीं नाणीं कऱ्हाडच्या जवळच्या एका

---

1. Arch. Sur. west. Ind. Vol. IV, p. 7.
Report of the Buddhist cave Temples and their Inscriptions by Jas. Burgess, 1883, p. 89.
2. Bombay Gazetteer, Satara, p. 224.
3. Cave Temples, pp. 213-217.

गांवांत नदीस पूर येऊन गेल्यावर नेहमीं सांपडत असें रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबईच्या शाखेच्या जरनलावरून दिसून येतें. त्यांतील उताराच खालीं देतों:—

"गेल्या बारा किंवा अठरा महिन्यांत सातारा कलेक्टराचे हद्दींतील (सातारा जिल्ह्यांतील) कृष्णेच्या कांठच्या एका प्राचीन गांवाच्या एका ठिकाणाहून मजकडे वेळोंवेळीं नाणीं पाठविण्यांत आलेलीं आहेत व त्यांच्या तपासणीवरून कच्छच्या निधीवरून केलेला तर्क दृढ होत आहे. ज्या परिस्थितींत तीं सांपडलीं ती परिस्थिति या संशोधनासाठीं निधि एवढ्याच किंमतीची आहे. जमीन जसजशी पाण्यानें धुऊन जाते तसतशीं तीं एक एक सांपडतात, आणि तीं एवढीं सांपडतात कीं, त्यावरून तीं ह्या ठिकाणचीं चलनीं नाणीं असून तीं पुष्कळच प्रचारांत होतींसें दिसतें."[1]

विजयसेन, दामजदश्री ३ रा, रुद्रसेन २ रा, विश्वसिंह, भर्तृदामन् व विश्वसेन या सहा महाक्षत्रपांचीं नाणीं कऱ्हाडास सांपडलीं आहेत.[2] हे इ० सन २९० पासून[3] ते इ० सन ३०४ पर्यंत राज्य करीत होते. पण हल्लीं वरील नाणीं तेथें सराफांचेकडे वगैरे पाहावयास मिळत नाहींत. तथापि टिळक हायस्कूल ते लंगरमसजिदीपर्यंतची जागा प्राचीन असावी. या हायस्कूलचे आसपास क्षत्रपांचीं दोन नाणीं सांपडल्याचें ऐकिवांत आहे.

दाभोळ दरवाजाच्या लगतच्या भिंतींत एक सुंदर स्त्रीची प्रतिमा खोदलेला बहुधा द्वाराचा दगड अर्धाअधिक गडप झाला आहे. ती भिंत श्रीमंत पंत

---

1. During the last twelve or eighteen months coins have from time to time, been sent to me from the site of an old village on the banks of Kṛishṇā near Karād, in the Satara Collectorate, and an examination of these confirms the inference drawn, from the Kutch deposit. The circumstances under which they are found make them as valuable for the purposes of this inquiry as those composing a hoard. They are discovered singly as the soil is washed away by the rains and the neighbouring stream, and in such quantities as to show that they must have formed the currency of the place, and been plentifully in circulation." —*Extract from page 16 of No. XXII.*

2. Bombay Gazetteer, I. p. 48, History of Gujrāt.

3. Catalogue of the coins of Andhra Dynasty, the Western Kshatraps, Traikūṭaka and Bodhi Dynasties by E. J. Rapson, M. A., 1908 and Arch. Survey. Report of India, 1913-14, p. 245.

प्रतिनिधींचे मालकीची आहे. तेव्हां वरील दगड भा. इ. सं. मंडळांत वगैरे ते ठेवतील तर उत्तम. त्यावर कोरलेली मूर्ति इ. सनाच्या सहाव्या शतकांतील दिसते.

## २. जैन-अवशेष

हाटकेश्वराचे देवळाचे गटारावरील एक दगड आम्हीं आणिला आहे. त्यावर अल्प नक्षीचें काम आहे. त्यावरून अंदाज केल्यास हें इ० सन ७०० ते ९०० च्या दर्म्यानचें असावें. दगडावरील मूर्ति जैनांच्या असाव्यात. बालाजीच्या देवळापासून सुमारें १२५-१५० हातांवर कोटाखालील भंग्याचे घराखालीं तुटल्या-फुटलेल्या सुमारें १०व्या शतकांतील २।३ दिगंबर जैनांच्या मूर्ति गुदस्ता आम्हीं आणिल्या; पण त्यांच्या पायांखालील चिन्हें फुटून गेल्यामुळें त्या कोणत्या तीर्थंकरांच्या असाव्यात हें सांगतां येत नाहीं. जखिणवाडीस आम्हीं एका आवारांतून एक अशीच तुटकी दिगंबर जैनांची मूर्ति हुडकून काढून तिचें छायाचित्र घेतलें. कांहीं आणखी छायाचित्रें देण्याचा विचार होता; पण खर्च झेंपेना म्हणून तो तिसऱ्या आवृत्तीपर्यंत तरी तहकूब करणें भाग आहे. भा. इ. सं. मंडळानें एक जैनांची प्रतिमा असलेला व पुसट लेख असलेला दगड पुण्यास नेला आहे. तो मंडळ-मंदिराच्या पडवींत आहे. पण एकंदरींत कऱ्हाडास जैन-अवशेष फारसे नजरेस पडत नाहींत.

## ३. हिंदु-अवशेष

वास्तविक बौद्ध व जैन हे धर्म हिंदु धर्माच्याच शाखा आहेत. पण त्या इतक्या वाढल्या आहेत कीं, मूळ वृक्षाकडे नीट लक्ष द्यावें तेव्हांच तो स्पष्ट दिसूं लागतो. या दोन्ही शाखांचीं तत्त्वें उत्तम आहेत. पण तीं सामान्य लोकांस प्रचारांत आणण्यास फारच अवघड आहेत. त्यांतल्या त्यांत बौद्धधर्म हिंदुधर्माच्या जात्यादि संस्थांच्या विशेष उलट असल्यामुळें त्यावर शंकराचार्यादि हिंदुधर्माच्या पुरस्कर्त्यांचा इतक्या जोराचा हल्ला झाला कीं, तो धर्म हिंदुस्थानांत बाराव्या शतकांत नामशेष होऊन त्यापुढें तर त्याची हिंदूस विस्मृतिच झाली. ती इतकी कीं, सर्व बौद्धधर्माच्या लेण्यांस पांडवांचीं लेणीं म्हणूं लागले. पांडव इतक्या खालीं आलेच नाहींत. पण नासिकास जा, कार्ल्यास जा, जुन्नरास जा,

अथवा कऱ्हाडची सफर करा, तेथील लेणीं पांडवांनीं एका रात्रींत कोरलीं व अपुरे राहिलेले भाग कोंबडा आरवल्यामुळें तसेच राहून गेले असें भाविक लोक सांगतात. तथापि पूर्वीची अंधुक स्मृति कायम आहे. एक उदाहरण देतों. जखिणवाडीस मळाई देवी आहे. तिची पालखी आश्विन शुद्ध १स देवळाभोंवतीं फिरविण्यापूर्वीं बावनचावडी (लेणें क्रमांक २२)च्या अलीकडील जखिणवाडीच्या लेण्यांतून एक दगड आणावा लागतो. याचा अर्थ काय? अर्थ इतकाच कीं, पूर्वीच्या धर्माच्या स्थानाची कोणत्याना कोणत्या रूपानें लोकांस अर्धवट आठवण आहे. ही सर्व माहिती थोडक्यांत देण्याचें कारण इतकेंच कीं, हे बौद्धधर्माचेच प्राचीन अवशेष हिंदु धर्माचीं ११व्या, १२व्या शतकापासून किंवा कऱ्हाडसारख्या कांहीं ठिकाणीं ७व्या शतकापासून स्मृतिस्थानें झालीं असावींत. म्हणजे बौद्धधर्माचे अवशेष आतां हिंदुधर्माच्या अवशेषांत मोडूं लागले असावेत. शक्तींत पांची पांडवांतच नव्हे, तर त्या वेळच्या कोडो लोकांत भीमाचा हात धरणारा कोणी नसल्यामुळें व त्याचें मुख्य आयुध गदा असल्यामुळें चैत्यगृहांतील दागोबास साहजिकच त्याची गदा बनविण्यांत आली.

कऱ्हाडास शिवपूजा ९व्या शतकापूर्वीं कैक शतकें अस्तित्वांत असेल. हाटकेश्वर वगैरे लिंगें इ० सनाच्या पूर्वीचीं, बौद्धधर्माच्या पूर्वीचीं असतील. पण त्यांचा स्मृतीपलीकडे मागमूस नाहीं. एक तर पांचव्या सहाव्या शतकापूर्वीचीं देवळें हिंदुस्थानांत कोठेंच सांपडत नाहींत. दुसरें, कऱ्हाडास इसवी सनाच्या प्रारंभापासून किंबहुना अगोदरपासून नास्तिक लोक असल्यामुळें हिंदुधर्मावर हल्ले झाले असले पाहिजेत. मुसलमानी अमदानींत जे थोडे अवशेष काळाच्या दाढेंतून राहिले असतील तेहि नष्ट झाले असावेत असें गॅझीटीअरकारांचें मत आहे. कांहीं असो. इसवी सनाच्या ६।७ शतकाच्या पूर्वीचे अवशेष कऱ्हाडास जमिनीच्या वर तरी दृष्टोत्पत्तीस येत नाहींत.

रा० ग. अं. जोशी यांनीं खरेदी घेतलेल्या घरांतून उत्तर गुप्तकालीन धर्तीच्या नक्षीचे दोन दगड आम्हीं हस्तगत केले आहेत. ते सातव्या शतकांतील दिसतात. काझीसाहेब यांचे जमिनींत सुमारें नवव्या शतकांतील एका

लहान पण सुंदर देवळाचे अवशेष मिळालेले आहेत. एकावर गंगायमुनेच्या प्रतिमांच्या धर्तीवर मूर्ति खोदिलेल्या आहेत.

कऱ्हाडास सांपडलेला एक महत्त्वाचा राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या कृष्णराजाचा (इ०सन ९५९तील) ताम्रपट कै० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं एपिग्रॅफिआ इंडिकांत छापलाच आहे. त्याचा उल्लेख खालीं इतिहास वगैरे सदरांत येणारच आहे. कोटांतल्या भवानीच्या देवळांतील देवीखालचें आसन इसवी सनाच्या ९ व्या ते ११ व्या शतकांतील दिसतें. वरच्या व खालच्या फुलांच्या नक्षीचें काम प्रेक्षणीय असून तीन मूर्ति उत्कृष्ट कोरलेल्या आहेत. ९ व्या ते १२व्या शतकांतील ब्रह्मदेवाच्या व त्रिमूर्तीच्या प्रतिमा उपलब्ध झाल्या आहेत. बालाजीच्या देवळासमोर जमविलेल्या प्रतिमांत एक खंडित व झिजलेली नागाची मूर्ति आहे. मंगळवारांतील वेशीजवळ एका कोळ्याचे घराचे मागील बाजूस देवळाचे द्वाराचा एक दगड आहे. त्यावर एका बाजूस शंकरपार्वती नंदीवर बसल्याचा देखावा असून दुसऱ्या बाजूस तीं सिंहावर आरूढ झाल्याचें दाखविलें आहे. श्रीमंत पंतप्रतिनिधींच्या कोटांत पाणदरवाजाजवळ खंडित मूर्तींचा एक दगड एका पायास लागला होता. तो इसवी सन १२व्या १३व्या शतकांतील असून औंधास पाठविण्यांत आला आहे. कांहीं वर्षामागें रा० गिजऱ्यांस कार्तिकेयाची सुंदर मूर्ति कोरलेला एक महिरपीचा काळा दगड सांपडला होता. तो आम्हीं त्यांचे विचारानें इसवी सन १९२६त भा. इ. सं. मंडळास अर्पण केला. मसजिदीजवळील दोन मनोऱ्यांच्यामधील जागीं १२व्या १३व्या शतकांतीलच एक खांब लागला आहे. श्रीकृष्णाबाईचे समोरील काशीविश्वेश्वराचें द्वार याच सुमाराचे दोन उभे खांब व एक आडवा खांब यांचें बनविलेलें आहे. काझीसाहेबांचे जमिनीचे पलीकडील उंचवट्यावर सुमारें १२व्या शतकांतील महिराप कोरलेला एक संगमरवरी दगड एका कोळ्यास उकरतांना इसवी सन १९२७त मिळाला. कोटांतील बावडींत १०व्या ते १३व्या शतकांतील हिंदूंच्या देवालयाचे खांब, उंबरे वगैरे खालील व वरील दोनचार भागास लाविलेले आहेत. इदग्याजवळ लक्ष्मीदेवीचें एक भव्य मंदिर होतें. तें इतकें उंच होतें कीं, त्याची छाया नदीकांठपर्यंत पडे.

तें मोडून इदगा व कबरस्थानाचा कांहीं भाग असे बांधण्यांत आले. पण त्याचा चबुतरा अद्यापि कायम आहे. इदग्याचे भिंतींत दोन तीन मूर्ति खोदलेले दगड डोकावीत आहेत. कांहीं खोदीव दगड उलटे लाविलेले आहेत. त्यांत एकादा लेख गडप झाला असल्यास नकळे! इदग्यांत १२व्या व १३व्या शतकांतील गवंड्यांच्या खुणांचीं अक्षरें कोरलेला व एक ओबडधोबड आकृति काढिलेला दगड लागलेला आहे. हा प्राचीन लक्ष्मीचे देवळाचा अथवा त्याचे आसपासचे एखाद्या आनुषंगिक देवळाचा असणें संभवनीय आहे. महालक्ष्मीची मूर्ति थोडी विच्छिन्न झालेली इदग्याजवळील तळ्यांत सांपडली. ती बहिरोबाचे आळींतील महालक्ष्मीचे देवालयांत बसविण्यांत आली असें सांगतात. ती काळ्या दगडाची असून घडणीवरून १२व्या, १३व्या शतकांतील असणें अगदीं संभवनीय आहे. अंदाजानें याच शतकांतील ख्वाजा खिजरच्या दरग्या-जवळ असलेला, पण हल्लीं अस्तित्वांत नसलेला, चावडीजवळील गणपति श्री० पंतप्रतिनिधींनीं कोटाखालीं स्थापिला. त्यास इसवी सन १८२० सालीं श्रीमंत परशुराम श्रीनिवास प्रतिनिधींनीं मलकापुरवाडीस जमीन इनाम दिली. हल्लींच्या देवळाचें काम इ० सन १८८०त श्री० श्रीनिवास परशुरामांचे कारकीर्दींत पुरें झालें. शनिवारचे बाजूचे वेशीचे ( हल्लीं ती वेस जमीन-दोस्त झाली आहे ) बाहेरच असलेल्या देवळांतील गणपती वरील गणपतीचे काळचाच असावा. पावकेश्वर व आनंदेश्वर यांचीं पुरातन देवालयें कोटांत होतीं असें सांगतात. श्री० पंतप्रतिनिधींचे वहिवाटदारांच्या घरांत १२व्या ते १४व्या शतकांतील देवालयांचे कांहीं अवशेष आहेत, ते यांचेच असण्याचा संभव आहे. पण हल्लींचें पावकेश्वराचें देवालय सैदापुरास असून आनंदेश्वराचें गोट्यास आहे.

याच कालांतील म्हणजे १२व्या ते १४ व्या शतकांतील कांहीं विच्छिन्न पण पुराणवस्तु या दृष्टीनें रक्षणीय प्रतिमा कृष्णार्पण अगदीं अलीकडे करण्यांत आल्या व कांहीं रामाच्या देवळाच्या पायांत घालण्यांत आल्या!

मंगळवारांत टिळक हायस्कूल आहे. ती बाजू प्राचीन आहे हें वर आलेंच आहे. तेथें क्षत्रपांचीं नाणीं मिळालीं तीं अगदीं खालच्या भागांत

सांपडलीं असलीं तरी वरील पाये तेवढे जुने नाहींत. आमचें साताऱ्यास यूनियन क्लबामार्फत भाषण झालें. तेव्हां ॲडव्होकेट रा० ब० काळे हे बोलले कीं, 'प्रो० डॉ० दे. रा. भांडारकर यांचे मतें ते शिलाहारांच्या राजवाड्याचे पाये असावेत'. असतील कदाचित्. पण याचा अंदाज करण्यास साधन नाहीं.

संगमाजवळ [क्रमांक ९ पहा.] संगमेश्वर महादेवाचे पलीकडे कोटाखालीं असलेल्या उंचवट्यास लागून ज्या झिजलेल्या पायऱ्या आहेत त्या कोटांतील देवळांवरून नदीवर जाण्याच्या घाटाच्या असणें संभवनीय आहे.

मंगळवाराचे पलीकडे लंगर मसजिदीचे आसपास शेतांतून मडकीं, विटा वगैरेंचे भरपूर अवशेष आहेत. त्या बाजूसच जुनें कऱ्हाड होतें असें म्हणतात. तेथें क्वचित् नाणींहि पूर्वीं उपलब्ध झाल्याचें ऐकिवांत आहे. तथापि भूमिगत द्रव्याचा कायदा पसार होण्यापूर्वींच्या मिळालेल्या त्या नाण्यांचें संशोधन चांगलें झालें नसल्यामुळें व त्या बाजूस खणकाम झालेलें नसल्यामुळें साधार विधानें करितां येत नाहींत. तरी जे अवशेष तपासतां येतात त्यांवरून इ०सन १३००।१४००चे पर्यंतचे ते असावेत. सराफांकडे क्वचित् कृष्णराई होन पहावयास मिळतात.

कऱ्हाडास ठिकठिकाणीं युद्धांत पडलेल्या लोकांचे दगड तर शेंदोनशें आहेत. त्यांपैकीं कांहीं सुबक आहेत, त्यांवर योद्ध्यांच्या आकृत्या खोदलेल्या असून लढाईंत पडलेला मनुष्य स्वर्गीं गेल्याचें दाखविलेलें आहे. कांहीं सामने पायदळांचे चित्रित केलेले असून कांहीं घोडेस्वारांचे केलेले आहेत. बऱ्याच झटापटी गांवकीच्या भानगडीच्या दिसतात. तथापि कांहीं दगड तुंबळ युद्धाचे निदर्शक आहेत. अशी एक शिला कोटांत आहे. श्रीकृष्णाबाईचे देवळाजवळ असलेल्या स्मारकांतील मुख्य योद्ध्यानें आपले दोन्ही हात कष्टानें आपल्या मस्तकावर ठेविले आहेत.[1] त्याचें छायाचित्र सोबत आहे. [क्रमांक ६ पहा.] त्या सर्व आकृत्यांवरून तत्कालीन पोषाख, शस्त्रास्त्रें, चालीरीति, गांवकीच्या भांडणांच्या व युद्धाच्या पद्धति कळतात. तसेंच हिंदु लोकांच्या समाजाप्रमाणें योद्ध्यास कशी स्वर्गप्राप्ति होई याची कल्पना येते.

१. आमचें तारीख २९-१-२८ रोजीं साताऱ्यास झालेलें व्याख्यान.

ख्वाज़ा खिजरच्या दर्ग्यापासून थोड्या अंतरावर १५व्या शतकांतील हेमाडपंती धर्तीवर बांधिलेल्या एका देवळाचे अवशेष आहेत. त्यांत बिरोबा बसविलेला आहे. आसपास कांहीं वृंदावनें आहेत.

कमळेश्वराचे देवळाखालील टिळा पुरातन असण्याचा संभव आहे. पण देऊळ फार जुनें नाहीं.

पलीकडे संत-सखूबाईचें देऊळ आहे. त्यास लागून मंडप होता. तो अलीकडेच पडला. बाजूच्या धर्मशाळाहि अलीकडेच जमीनदोस्त झाल्या. त्या देवळाचें छायाचित्र सोबत दिलें आहे. [क्रमांक ७ पहा.]

खालील बाजूस संत-सखूबाईनें बांधिलेलें पुंडलीकाचें देवालय आहे.

रा० सखाराम बापूजीराव डुबल यांचे परसांत एक शिवकालीन शिलालेख आहे. तो असा:—

“ [१] ॥ स्वस्ति श्री नृपशालि [–] ॥
[२] ॥ वाहन शके १५९ [४] प [रि–] ॥
[३] ॥ धावी [1]सवछर बलदेव सह
[४] ॥ यशश्री पिलदेव रामरामी
[५] ॥ कुलकरणी कसबे करहाट [–]
[६] ॥ कर यानी देवालय माय [–]
[७] ॥ लेकरे गताग [तम्.] ”

तो आसपासच्या पण हल्लीं अस्तित्वांत नसलेल्या देवालयांत बसविलेला असावा. तें देवालय करहाटकर कुलकर्णी रामरामी अथवा रामरामे किंवा रामनामे यांनीं शके १५९४ परिधावी संवत्सर इ०सन १६७२–१६७३ यांत बांधिलें होतें असें दिसतें.

संत-सखूबाईच्या देवळाच्या खालचे बाजूस नृसिंहाचें देवालय आहे. तें गोसावी अनगळ यानें शके १६६६त बांधिलेलें दिसतें. कारण त्यापुढील चबुतऱ्यांतील एका दगडावर “ श्रीसद् नृसिंह प्रसन्न शके १६६६

१ मूळांतील अशुद्धें कायम ठेविलीं आहेत.

रक्ताक्षी संवत्सरे गोसावी अनगळ " असा लेख आहे. अर्थात् हा लेख इसवी सन १७४४ तील आहे.

त्या देवालयाचे मागें श्रीत्र्यंबकेश्वराचें शिवालय आहे. तें त्र्यंबक दीक्षित उंबराणी यांनीं बांधिलें. त्या देवाचे पूजानैवेद्यास लाटकरांस खाजगी इनाम दिलेलें आहे.

संगमेश्वराचें देवालय हल्लींच्या संगमाचे जवळच आहे. तें प्राचीन नाहीं. प्राचीन कोठें असेल तें सांगणें कठीण आहे.

कोटांत श्रीमंत प्रतिनिधींचा वाडा आहे. त्यांची कचेरी पडलेली आहे. पण तिच्या भिंती तिची साक्ष देत आहेत. श्रीमंतांनीं बांधिलेलें श्रीभवानीचें देऊळ आहे. त्यांतील देवीची पूजाअर्चा होते.

पेठेंत सुप्रसिद्ध यमाजी शिवदेवांचे वंशज सरदार मुतालिक यांचा वाडा आहे. पण त्याचा बराच भाग हल्लीं पडलेला आहे.

कृष्णेच्या तीरीं डुबल यांच्या समाध्या आहेत. कमलेश्वराच्या देवळाखालीं लिंगाइतांचीं व ( डुबलांच्या समाध्यांजवळ ) बटाण्यांचीं शिवालिंगें आहेत.

वाहून गेलेल्या एका समाधीचे दगड गुदस्तां अवास्तव पडलेले होते. त्यांपैकीं एकावर खालील लेख दृष्टोत्पत्तीस आला तो असा:—

[१] " श्री शके १७१८ नळनाम संवछरे श्र (श्रा—)
[२] वण शुध ७ सोमवारी सातारा मोडक
[३] [शमीव (समाप्त?) जाले] शके १७२४ दुंदुभीना [—]
[४] म स(सं)वछरे कार्ती(र्ति)क मासी भागीरथी [—]
[५] चे स्थली समाप्ती जाली [.] समाप्त [.]"

प्रस्तुत लेखाचा उपयोग कै० रा०सा० मोडकांची जंत्री दुरुस्त करण्यास होतो. तीप्रमाणें शके १७१८ नळनाम संवत्सर श्रावण शुद्ध ५स सोमवार येतो. पण खरोखरीं सोमवारीं सप्तमी येते हें या तत्कालीन लेखावरून सिद्ध होतें.

इसवी सन १८४७त कोटाखालीं बांधिलेली परिपूर्णानंद स्वामींची

समाधि आहे. तिच्या आसपासच्या पंतांच्या बागेस स्वामींची बाग म्हणत व म्हणतात. हल्लीं ती उजाड आहे.

## ४. मुसलमानी अवशेष


आतां मुसलमानी अवशेषांकडे वळूं. भुईकोट किल्ल्याचा बराच भाग आदिलशाहीच्या अगोदरचा आहे असें म्हणतात. कोटाच्या भिंती जरी श्री. प्रतिनिधींच्या वेळीं दुरुस्त केलेल्या आहेत, तरी किल्ल्याचा कांहीं भाग ब्राह्मणी राज्याच्या वेळचा मानितात. तसें असणें असंभवनीय नाहीं. अशी एक दंतकथा आहे कीं, वरील भुईकोट किल्ला बांधून नदीचा ओघ पालटण्यांत आला. पूर्वीचा ओघ बालाजीचे देवळाचे बाजूनें होता. हीहि गोष्ट जमिनीची पाहणी केल्यास संभवनीय दिसते.

किल्ल्यांत पश्चिमेस एक मोठी थोरली बावली अथवा बावडी[1] असून तिची खोली नदीचे पाण्याइतकी आहे. नदीचें पाणी तींत मोठ्या नळानें सोडिलें आहे. शत्रूंनीं किल्ला हस्तगत केला तरी तींत सैन्यास दडून बसतां यावें एवढ्यासाठीं ती बांधिली असें म्हणतात. पण गॅझीटीअरकारांचे मतें सामुग्री सांठविण्यासाठीं तिचा उपयोग करीत असावेत. ती विजापूरचे बादशहाचे अगोदरची आहे म्हणतात. वर निर्दिष्ट केलेले देवालयांचे खांब, उंबरे वगैरे तींत लागलेले आहेत. त्यांवरून, तींतील कमानीवरून व इतर बांधकामावरून ती मुसलमानी अमदानींत बांधिली गेली यांत मात्र संदेह नाहीं. ती हल्लीं नकट्या रावळाची विहीर या नांवानें जास्त प्रसिद्ध आहे.


लक्ष्मीचें जुनें देऊळ मोडून इदगा उभारण्यांत आला हें वर आलेंच आहे. तो तीस फूट उंच व २५० फूट लांब आहे. त्याचे देवळींत एक शिला बसविलेली आहे. तीवरील लेखाचें भाषांतर असें:—

जगाचा रक्षणकर्ता, परमेश्वरकृपेची छाया शाह आली आदिलशाह राज्य करीत असतां मुसलमानांचीं प्रेतें पुरण्यास व इदग्याच्या दुरुस्तीस एक चाहूर जमीन सार्वजनिकरीत्या देण्यांत आली आहे व राखून ठेवण्यांत

१. पायऱ्या असलेली विहीर.



६. श्रीकृष्णाबाईचे देवळाजवळील लढाईंत पडलेल्या योद्ध्याचा दगड. पृष्ठ १३.



७. श्रीकृष्णेकांठचें संत सखूबाईचें देवालय. पृष्ठ १४.



८. २ऱ्या अली आदिलशाहाचे कारकीर्दींत बांधिलेली व बाजूस मनोरे असलेली मसशिद. पृष्ठ १७.



९. चांदबिबीनें ज्या दर्ग्याचा वरचा भाग बांधिला तो मौलालीचा दर्गा. पृष्ठ १८.

झाली आहे. यास अडथळा करण्यास कोणास अधिकार नाहीं. हिजरी [सन] ९८०.

पहिल्या अली आदिलशाहाचेच (कारकीर्द इ० सन १५५७-१५८०) वेळची इब्राहीमखानानें[1] बांधिलेली तेथें मसजिद असून तिचे बाजूस १०६ फूट उंचीचे दोन भव्य मनोरे आहेत. तिच्या बांधकामास हिजरी ९८० (इ० सन १५७२)त सुरुवात होऊन तें हिजरी ९८३ (इ० सन १५७६)त पुरें झालें. शिवछत्रपतींनीं अफझुलखानास प्रतापगडावर मारिल्यावर त्याचा पुत्र फाजलखान, खंडूजी खोपड्याचे मदतीनें पळून विजापुरास जाण्यासाठीं आला, तो तिच्या मनोऱ्यांपैकीं एकांत सुमारें एक महिना होता.

मसजिदींत एकंदर नऊ लेख आहेत. पैकीं सातवा कुफलिफ लिपींत असून वाचतां येत नाहीं. पण तो कुराणांतील उतारा आहे. कऱ्हाडच्या त्या मसजिदीसंबंधीं दोन लेखांसच महत्त्व आहे. त्यांचें भाषांतर गॅझीटीअरच्या अनुरोधें असें आहे:—

३. "सर्व लोकांचा आधार व परमेश्वरकृपेची छाया शाह अली आदिलशाह—हा परमेश्वरावर विश्वास ठेवणारा राहो व ह्यास प्रकृतीचें स्वास्थ्य आणि खिलात (अथवा देणगी) मिळो—ह्याचे कारकार्दीत घराण्याचा मित्र इब्राहीम कामीलखान यास."[2]

दुसऱ्या एका विद्वानानें शेवटच्या वाक्याचा अर्थ "इब्राहीम कालीमखानाचे मदतीनें महंमदखानानें बांधिली" असा केला आहे.

४. गरीब निःशक्त धुळीप्रमाणें (नम्र) असलेला अहमद इस्पहानीचा पुत्र पेहेलवान् अली, परमेश्वराचा सेवक [तुझयेतखान[3] पदवी असलेला?]

---

१. मुंबई गॅझीटीअर, सातारा, पृष्ठ ४७५.

2. The third "During the time of Shāh Ali Adil Shāh, the shelter of all the people and the shadow of the favour of God—may he continue faithful and enjoy health and Khilat (or grant) to Ibrāhim Kāmil Khān a friend of the family." —*Bombay Gazetteer, Satara, p. 475.*

३. हें नांव ताझियतखान असावें असें दुसऱ्या एक विद्वानानें सुचविलें आहे.

परमेश्वराच्या घरांत सन ९८३. [या वर्षी ही मसजिद] पुरी केली. ही मसजिद बांधणाराच्या तर्फे प्रार्थना करा.[1]

दुसऱ्या एका विद्वानानें "हिची देखरेख गरीब, दीन, धुळीप्रमाणें नम्र अहमद इस्पहानीचा पुत्र पेहेलवान अली याजवर तीर औझदखान याच्या रक्षणाखालीं हिजरी ९८० (९८३ ?)त सोंपविली. जो ही तारीख (वर्ष असलेली शिला) वाचील त्यानें ही मसजिद बांधणाराच्यासाठीं प्रार्थना करावी" असा केला आहे.

गुरुवारांत दोन दर्गे आहेत. ते दोन मुसलमान पीरांचे असून हिजरी सन ७९२ व ७९३ यांत बांधिलेले आहेत.[२] दोहोंत एक उंच आहे. त्याचा वरचा भाग सुप्रसिद्ध चांदबिबीनें त्यांतील मौलाली (महंमद पैगंबरचा जांवई) पावला एतदर्थ त्याचे स्मरणार्थ बांधिला. कमी उंच असलेला दर्गा नबीसाहेब (महंमद पैगंबर) याचा आहे. त्यांत त्याची मुलगी बी फातिमा हिचा पंजा आहे. दोन्ही दर्ग्यांस विजापुरचे बादशहाचीं इनामें चालू आहेत. बलखंडी अथवा बनखंडी (मूलार्थ वनांत राहाणारा) संबोधिला जाणारा एक फकीर होता. तो दर्ग्याजवळच्या झाडींत राहात असे. तेथेंच तो वारला. त्याची कबर तेथेंच आहे. ती दर्ग्याच्याहि अगोदरची आहे म्हणतात. तीस विजापुरच्या बादशहानें वीस एकर जमीन इनाम दिली होती.

मंगळवारांत कडेंपीरवाडींत कडेंपीराचें थडगें आहे. "कडेंपीर" हें नांव "कऱ्हाडचा पीर" यावरून पडलेलें असावें. या पीरावरून कऱ्हाडास नांव दिलें गेलें असा समज कांहीं लोकांचा आहे. पण त्यांत तथ्यांश नाहीं; कारण करहकट, करहाडक, करहड वगैरे नांवें प्राचीन लेखांत येतात. कांहीं प्राचीन लेखांत जमीनीचें नांव "करड" असें येतें. थडगें असलेल्या जमीनीचें

1. The fourth on another pillas records "The beggarly powerless and dust like Pehelwān Ali bin Ahmad Ispahani, a servant of God in this house of God, Sunah 983 titled (?) Tuzyet Khān. Completed on this date. Pray for the welfare of the builder of this mosque."

—*Bombay Gazetteer, Satara, p. 475.*

२. मुंबई गॅझीटीअर, सातारा, पृष्ठ ४७६ व दर्ग्याचे वहिवाटदार मुतवल्ली यांनीं दिलेली माहिती.

नांव "करड" असल्यास तीवरूनहि पीरास नांव पडणें असंभवनीय नाहीं. मूळ पीराचें नांव शेख फरीद तुमर होतें. हा धर्मप्रसारार्थ कऱ्हाडास गेला. सुमारें हिजरी ६६९त हा वारला असें कऱ्हाडच्या मुसलमान लोकांचें म्हणणें आहे. याच्या बहिणीचें नांव बिबी दुलहन होतें. हिचे वंशज शेख अहमद वा। शेख फरीद यांस सु।। सन १०२०,१४ रबिलाखरास (इंग्रजी तारीख ९ मार्च इ० सन[1] १६२० हीस) दिलेली सनद शेख अमीन वा। शेख हासन मुजावर, कऱ्हाडकर, यांजपाशीं आहे असें म्हणतात.

शनिवारांत ख्वाजा खिजरचा दर्गा आहे. त्याचें एक सुबक छायाचित्र आमचेपाशीं आहे. पण तें प्रसिद्ध करणें पुढील आवृत्तीवर लोटिलें पाहिजे. त्या दर्ग्याचे दिवाबत्तीसाठीं मुजावरांस आदिलशाही अंमलदारांनीं दिलेले हुकूम आजहि अस्तित्वांत आहेत.

कचेरीचे जवळ काळा चबुथरा आहे. तेथें आदिलशाहींत न्याय होत असे. खालील बाजूस कळंबाचें झाड आहे. त्या ठिकाणीं देहांतशासन होत असे. त्याचे जवळच बहुतेक बुजलेला खड्डा आहे. त्या ठिकाणीं देहांतशासन झालेल्या मनुष्याचें प्रेत टाकीत.

विजापूरचे सैन्याचा तळ कऱ्हाडचे आसपास १।।–२ मैलांवर पडे. तेथें अद्याप १२-१४ पडकीं तळीं आहेत. त्यांत पूर्वीं विपुल पाणी असून कमळें वगैरे असत.

मुसलमान दफनभूमींतील लेख नीट तपासून पाहिले पाहिजेत. या कामांतच कोणा संशोधकानें महिनाभर घालविला पाहिजे. कांहीं लेख वाचावयास बरेच कठीण आहेत. एका शिलेवर हिजरी सन[2] दिला असून एका लोदीचें नांव आहे. कऱ्हाडच्या मुसलमानी अमदानींतील कांहीं अंमलदारांचींहि थडगीं आहेत. मक्केस कऱ्हाडास जमून जात, त्या वेळीं मृत झालेल्या सुप्रसिद्ध मुसलमानांचीं थोडीं थडगीं आहेत. यांच्या संशोधनाचा प्रयत्न करून पाहिला. पण कोणी मुसलमान मंडळी घालावें तसें लक्ष घालीनात. त्यांच्या मदती-

१. रा० द. वि. आपटे, बी. ए., यांनीं काढिलेली तारीख.
२. हा अस्पष्ट आहे.

वांचून एकट्याच्यानें हें कार्य करणें आटोक्याबाहेरचें झालें. हल्लींची बरीच ब्राह्मण वस्ती पूर्वींच्या दफनभूमीवर आहे. वेळोवेळीं थडगीं दृष्टोत्पत्तीस येतात व बुजविण्यांत येतात. त्यांचें संशोधन होत नाहीं.

भुईकोट किल्ल्याखेरीज कऱ्हाड शहराभोंवतीं मजबूत तट असून त्याचे बाहेर खोल खंदक होता. तटाचे व खंदकाचे अवशेष अद्यापि आहेत. कांहींचीं छायाचित्रें संग्रहीं आहेत. पण प्रसिद्धीचा खर्च कसा झेंपावा?

पेठेंतील दुसरी मसजिद कधीं बांधिली तें समजत नाहीं. पण तिची दुरुस्ती इ०सन १८९६ सालीं करण्यांत आली.

---

## कऱ्हाड शहराचा इ० सनापूर्वी २५० पासून मराठी अमदानीचे अखेरपर्यंत

## व्याप, विस्तार, व्यापार व त्याचें स्थित्यंतर

रा० वाग्भटराव देशपांडे यांच्या मतें जुनें कऱ्हाड कोठें होतें हें प्रथमावृत्तींत नसल्यामुळें तींत थोडें वैगुण्य राहिलें होतें. "कदाचित् अगाशिवाचीं व जाखिणवाडीचीं लेणीं. या लगत पूर्वीचें कऱ्हाड होतें असा तर्क केल्यास अगदींच चूक होणार नाहीं"[१] अशी त्यांची समजूत आहे. त्यांनीं आमच्या साताराच्या व्याख्यानाचा सारांश ऐक्यांत देऊन व अन्य रीतीनें जी आम्हांस सहानुभूति दाखविली तीबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानितों. पण वरील आक्षेपास उत्तर असें आहे कीं, कोणताहि पुराण-वस्तु-संशोधक तरी आधारांवांचून विधानें कशीं करणार? कऱ्हाडास कोणीहि खणकाम आजपर्यंत केलेलें नाहीं. अंदाजासाठीं खोल खळगे घेतल्याशिवाय कांहीं कळण्यास मार्ग नाहीं. आम्हीं आपल्या साताराच्या भाषणांत सांगितलेंच कीं, कऱ्हाडच्या जमीनीची साधारण पाहणी केल्यास इ० सनापूर्वीच्या दुसऱ्या तिसऱ्या शतकाच्या वेळचे अवशेष १२ ते १९ फुटांचे खालींच मिळणें शक्य आहे. येथें एवढें मात्र नमूद करण्यास हरकत नाहीं कीं, बौद्धकालीन कऱ्हाड अगाशिवाचे

---

१. ऐक्य, ता. १४ मे, १९२७, पृष्ठ ३.

अथवा जखिणवाडीचे लेण्यांच्या लगत असणें फारसें संभवनीय नाहीं. बौद्ध आपलीं लेणीं बहुधा मोठ्या गांवापासून दूर ( कांहीं मैलांच्या अंतरावर-सुद्धां ) असलेल्या डोंगरांत खोदीत. शहरापासून त्रास होऊं नये असा त्यांचा उद्देश दिसतो. नाशिक, जुन्नर, वेरूळ वगैरे ठिकाणचीं लेणीं पाहिलीं असतां हें सहज लक्षांत येईल. तेव्हां बौद्धकालीन कऱ्हाड लेण्यांपासून कांहीं अंतरावर असावें; पण नक्की कोठें होतें हें सिद्ध करण्यास पुरावा नाहीं. बौद्धकालाच्या पूर्वीचा अंदाज फक्त आख्यायिका व महाभारतांतील वर्णन यावरूनच तूर्त तरी करणें भाग आहे. एक म्हण अशी आहे कीं, 'कऱ्हाड होणार होतें काशी पण रेणुका देवी झाली विटाळशी'. आख्यायिका अशी आहे कीं, जमदग्नीचा विचार कऱ्हाडास काशिक्षेत्र बनवावयाचा होता. तो श्रीकृष्णेपर्यंत पत्नीसह येऊन पोंहोंचला. तथापि रेणुकादेवी अस्पृश्य झाल्यामुळें त्याचा तो बेत तसाच राहिला. 'आर्यांची वस्ती श्रीकृष्णेपर्यंत जाऊन थडकली; पण पलीकडे कऱ्हाड वगैरे ठिकाणीं बायकांस घेऊन जाणे धोक्याचें असल्यामुळें ते अलीकडेच राहिले व त्यामुळें कऱ्हाडास खरें काशीचें माहात्म्य प्राप्त झालें नाहीं' या स्थितीची तर वरील आख्यायिका निदर्शक नसेल ? या कालाच्या पुढें म्हणजे वरील बौद्धकाळांत गेलें, तर वर आलेलीं क्षत्रपांचीं नाणीं कऱ्हाडजवळच्या गांवांत विपुल व खुद्द कऱ्हाडच्या मंगळवार पेठेंत टिळक हायस्कूलच्या आवारांत दोन-तीन कां होईनात सांपडलेलीं आहेत. वरील गांवासंबंधीं पुष्कळ शोध केला; पण लोक दाद देईनात. याचीं कारणें भूमिगत कायदा व त्याअन्वयें झालेले खटले हींच होत. साताऱ्यास आम्हीं तेथील कलेक्टर मे० ॲबॉटसाहेब, आय्. सी. एस्., यांच्यासमक्ष सांगितलें कीं, हा कायदा दहा रुपये किंमतीचा माल मिळाल्यास लागू होतो. शिवाय पूर्वीं सरकारकडे जीं नाणीं हा कायदा पसार होण्याच्यापूर्वीं पाठविण्यांत आलीं तीं कोणत्या गांवीं मिळालीं हें संशोधनार्थ सांगितल्यास काय नुकसान होणार ? पण नाहीं. इतकेंहि झालें तरी जीं वरील नाणीं सरकारमार्फत तपासण्यांत आलीं, तीं गोंवारें गांवच्या आसपास मिळालीं असावींतसें वाटतें. या गांवासमोर नदीपलीकडे कऱ्हाडच्या बाजूस बाराव्या ते चौदाव्या शतकांतील अवशेष असल्याचें वर आलेंच आहे. न

जाणों, त्या पूर्वीचे(कदाचित् बौद्धकालांतीलहि) याच्या कांहीं फूट खालीं असतील. बौद्धकाल म्हणजे हल्लींच्या स्थितींतील महाभारत रचलें गेलें तो काल होय. त्यांतील उतारा खालीं येणारच आहे. त्यावरून उघड होईल कीं, कऱ्हाडास पाखंडवादी लोक असून सहदेवानें सहज दूतांच्या करवीं तेथून खंडणी गोळा केली. तेव्हां तें शहर फार मजबूत तटबंदीचें असेलसें वाटत नाहीं. पुढें ज्या कालास साधारणत: अंधकाराचा काल समजतात त्या वेळची कल्पना करवत नाहीं. पण इ० सनाच्या सहाव्या शतकापासूनचे कऱ्हाडास क्वचित् अवशेष उपलब्ध झालेले आहेत हें वर दिलेंच आहे. म्हणजे सहाव्या ते नवव्या निदान दहाव्या शतकापासूनचा कऱ्हाडचा कांहीं भाग शुक्रवारांतील काझीसाहेब यांच्या घरापासून तों शनिवारच्या तेल्यांच्या घरांमागील भागापर्यंत तरी वसलेला असावासें दिसतें. त्यांत इ० सनाच्या बाराव्या शतकापर्यंतच्या मूर्ति, महिरपी वगैरे सांपडलेल्या आहेत. तेव्हां निदान या कालापर्यंत तेथें वस्ती असावी. कोटाखालीं बालाजीच्या देवळाचे जरा पुढें जैनांच्या मूर्ति सांपडल्या. डुबल आळींत त्रिमूर्ति वगैरेंचीं तोंडें उपलब्ध झालीं. तेव्हां नवव्या, दहाव्या ते बाराव्या, तेराव्या शतकापर्यंत त्या भागांत वस्ती असावी. कमलेश्वराचें देऊळ असलेला टिळाहि बाराव्या ते चौदाव्या शतकांतील असेल. टिळक हायस्कूल ते थेट गोंवाच्याच्या समोरपर्यंतची व इदग्यापर्यंतची बाजू जुनी आहे. ती शतकवार लावणें संभवनीय नाहीं; पण तिचा कांहीं फुटांखालचा भाग इ०सनापूर्वीं २९० पासून चौदाव्या ते पंधराव्या शतकापर्यंतचा आहे. शिलाहारांच्या वेळची वस्ती टिळक हायस्कूलपासून इदग्यापर्यंत असावी. त्या भागांतच त्यावेळच्या गणपतीच्या मूर्ति मिळाल्या. श्रीलक्ष्मीची मूर्ति इदग्याजवळच्या तळ्यांतून काढिली. शके १३१८ (इ० सन १३९६) ते पुढें बारा वर्षें म्हणजे शके १३२९ (इ०सन १४०७) किंवा कांहीं लेखांप्रमाणें शके १३४८ (इ०सन १४२६)च्या दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या वेळेपासून दादो नरसो काळे यानें बेदरच्या राजापासून कौल घेऊन वस्ती करीपर्यंत कऱ्हाड जवळ जवळ उजाड झालें होतें. नांवाची वस्ती इतस्तत: होती इतकेंच. कऱ्हाडचा पुढील व्याप व त्याचें महत्त्व यांचें श्रेय बेदर व विजापूर या मुसलमानी राज्यांसच दिलें पाहिजे. मुसलमानांची

दफनभूमि या कालांत कर्डेपीरवाडींत, हल्लींच्या ब्राह्मणआळींत, मनोऱ्याच्या मसजिदीच्या भागांत, दर्ग्यांच्या व बनखंडीच्या आवारांत आणि इदग्याकडील भागांत होती. त्यांची वस्तीहि त्याच अंदाजानें होती. ब्राह्मण व हिंदु यांचा समाज मंगळवारापासून लंगर मसजिदीच्या खालपर्यंत राही. मराठ्यांच्या अमदानींत हल्लींची ब्राह्मणआळी व शुक्रवार पेठ यांस महत्त्व येऊन वस्ती दाट व रस्ते अरुंद झाले. हल्लीं शहराभोंवतीं जो तट दिसतो तो मुसलमानी अमदानीच्या अखेरचा व मराठ्यांचे राज्याचे सुरुवातीचा असावा. या वेळीं हल्लींच्या शुक्रवार पेठेच्या भागास, विशेषतः शिंपी आळीस, महत्त्व आलेलें होतें. जाम-इ मसजिदीचा पाया आज दिसतो त्याहून पुरुष अर्धा पुरुष खोल असे. म्हणजे आजूबाजूचा रस्ता तितका खोल असे.

## इतिहास, धार्मिक देणग्या, व्यापार, राहणी वगैरे

या सदरांत इ० सन २९० पूर्वींपासून तों कऱ्हाडचा मोबदला होईपर्यंतची थोडक्यांत वरील बाबींची माहिती देऊं. इंग्रजी अमदानीची हकीगत निराळी देऊं.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें कऱ्हाडचा बौद्धपूर्व वृत्तान्त तार्किक आहे. तर्कावरून विधानें करणें फारसें इष्ट नाहीं. तेव्हां त्या भानगडींत न पडतां आपण बौद्धांचे कालाकडे वळूं. यांचीं लेणीं अगाशिवाच्या व जखिणवाडीच्या डोंगरांत आणि बहिरव दऱ्यांत आहेत. त्यांवरून त्यांत बौद्धभिक्षु इतर ठिकाणांप्रमाणें पावसाळ्यांत चार महिने राहून धर्मप्रसारार्थ पावसाळा संपतांच बाहेर पडत असें मानण्यास हरकत नाहीं. तीं हीनयान पंथाच्या अगदीं पूर्वकालांतील इ० सनापूर्वी २९०च्या सुमारापासून तों इ०सनानंतर २००पर्यंतचीं असल्यामुळें त्यांत नक्षीकाम वगैरे अगदींच थोडें आहे. फक्त कठड्याचें काम (railing) पाहावयास मिळतें. तें पूर्वकालीन लांकडी घरांचें द्योतक आहे. लेण्यांतील भिंतीहि किंचित् कललेल्या दाखविल्या आहेत. बांबूचीं व लांकडी घरें अशींच बांधीत; कारण सरळ भिंती केल्यास त्यांस वरून दाब नीट मिळत नसे व घरें पडण्याची भीति राही. बौद्धांचीं हीनयान पंथाचीं लेणीं

तीन प्रकारचीं असतातः [१] कांहीं चैत्यगृहें म्हणजे ज्यांत फक्त प्रार्थना करावयाची तीं, [२] कांहीं चैत्यगृहें व लयनें म्हणजे प्रार्थनेचीं व राहाण्याचीं यांचा मिलाफ करून कोरलेलीं असतात तीं आणि [३] कांहीं फक्त लयनें राहाण्यासाठींच केलेलीं असतात तीं. "लेणें" हें लयन याचेंच प्राकृत रूप होय. प्रथम फक्त राहाण्याच्या खोदलेल्या खोल्यांसच "लयन" अथवा "लेण" किंवा "लेणें" म्हणत. पण पुढें हा शब्द तिन्ही प्रकारच्या खोदिलेल्या खोल्यांस लावूं लागले. प्रस्तुत लेण्यांत तिन्ही प्रकार दृष्टीस पडतात. मूर्ति असलेलें लेणें चैत्यगृह म्हणण्यास हरकत नाहीं. बाहेरचा सज्जा फक्त बसण्याचाच दिसतो. तसेंच धर्म, चक्र व दागोबा असलेलें जखिणवाडीचें लेणें होय. त्यापुढील दोन लेणीं, चैत्यगृह व लयन यांचे मिलाफ आहेत. बावनचावडी वगैरे लेणीं फक्त राहाण्याच्याच उद्देशानें खोदिलेलीं आहेत. बौद्धांच्या पोषाखाची कल्पना फक्त वरील चैत्यगृहांतील मूर्तीच्या कपड्यांवरून व शिरस्त्राणावरून करावयाची. [क्रमांक ३ पहा]. या लेण्यांत व बहिरोबाच्या लेण्यांत पाण्याचा विपुल सांठा असे. आजहि तत्कालीन हौदांत पुष्कळ पाणी असतें. बाकीच्या लेण्यांतून सुद्धां पाण्याचे हौद आहेत. प्रस्तुत लेणीं धनिकांनीं कोरिलेलीं दिसतात. त्यांस नासिक, कार्लें वगैरे ठिकाणांप्रमाणें राजाश्रय असेल किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. निदान कोणत्याहि राजाचा लेख त्यांत आज अस्तित्वांत नाहीं. कऱ्हाड दक्षिणेच्या रस्त्यावर असल्यामुळें कोल्हापुर वगैरे ठिकाणीं जाणारे भिक्षु तेथील लेण्यांत पावसाळा घालवीत, असें मानण्यास हरकत नाहीं.

या काळीं कऱ्हाडास बराच व्यापार चालत असला पाहिजे. कुडचा-सारख्या दूरच्या लेण्यांत लोखंडाचा व्यापारी महिकस याचें नांव आलेलें आहे. कऱ्हाडचे लोक सधन व मुख्यतः व्यापारी असल्यामुळेंच सहदेवास सहज त्यांजकडून खंडणी वसूल करतां आली असावी. हें वर आलेंच आहे. [पृष्ठ २२ पहा.] महाभारताच्या सभापर्वाच्या बत्तिसाव्या अध्यायांत त्याच्या दक्षिण-दिग्विजयांत कऱ्हाडचा उल्लेख असा आला आहे:—

तिमिङ्गिलं च स नृपं वशे कृत्वा महामतिः ॥
एकपादांश्च पुरुषान्केरला[1]न्वनवासिनः ॥ ७१ ॥[2]
नगरीं [3]संजयन्तीं च पाषण्डं करहाकटम् ॥
दूतैरेव वशे चक्रे करं चैनानदापयत् ॥ ७२ ॥

**अर्थः**—त्या बुद्धिमान् सहदेवानें (ताम्रद्वीपाचा राजा[4]) तिमिङ्गिल यास वश करून एकपाद, केरल, वनवासी (वनवासीचे राहाणारे) हे लोक नगरी संजयन्ती व ज्यांत पाखण्डवादी लोक आहेत असें करहाटक (कऱ्हाड) हीं (आपल्या) दूतांकडूनच ताब्यांत आणिलीं व त्यांजकडून कर वसूल केला.

यांत करहाटकास पाषंडी हें विशेषण लाविलेलें आहे. 'ष' व 'ख' सारखाच काढीत. देहीचे बाजूस अद्यापहि काढितात. वरील विशेषणांवरून कऱ्हाडास पाखण्डवादी लोक होते हें सिद्ध होतें. हे बहुधा बौद्ध लोक असावेत. हल्लींचें महाभारत इ० सनाच्या पहिल्या दुसऱ्या शतकांपूर्वी पुरें झालेलें गृहीत धरिलें तरी हें विधान सयुक्तिक दिसतें; कारण या वेळच्या बौद्धधर्मी-यांचे अवशेष आगाशिवाच्या लेण्यांतून आहेत. कांहीं नंतरचेहि आहेत. जैन धर्माचे एवढे प्राचीन अवशेष कऱ्हाडचे आसपास नाहींत. त्या बाजूस जैन धर्माचा प्रसार फार पुढें झाला.

कऱ्हाडास साधारणपणें हीनयानपंथाचा प्रसार इ०सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत होता असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. कदाचित् तो पांचव्या शतकापर्यंतहि असेल. पण महायान पंथाचें एकसुद्धां लेणें नाहीं.

या पंथाचे अवशेष भूमिगत असल्यास न कळे. पण बौद्धांचें स्तोम

---

१. "केवलान्" असा दुसरा पाठ उत्तरेकडील महाभारताच्या प्रतींचा आहे.
—डॉ० व्ही. एस्. सुकठणकर यांच आम्हांस ता. १९-१२-१९२८चें आलेलें पत्र.

२. यापुढें कांहीं दक्षिणेकडील प्रतींत भृगुकच्छ, बर्बोर, पार्शी, सिन्धु काबूल, व विदर्भ वगैरेंचा उल्लेख आहे. —डॉ० सुकठणकर.

३. "स जयन्तीं च" असा दुसरा पाठ उत्तरेकडील प्रतींचा आहे.
—डॉ० सुकठणकर

४. रा० ब० वैद्य यांचें ता. १९-१२-२८चें आम्हांस आलेलें पत्र.

कऱ्हाडांतून कदाचित् या वेळीं नाहींसें झालें असणें असंभवनीय नाहीं. लिंग-पूजा फार प्रचारांत आलीहि असेल. सहा महाक्षत्रपांचीं नाणीं कऱ्हाडजवळच्या गांवांत (बहुधा गोंवाऱ्यांस) उपलब्ध झालीं. त्यांपैकीं कोणचीं तरी दोन कऱ्हाडासहि मिळालीं. यावरून तेथें त्या सहा महाक्षत्रपांचें राज्य इ० सन २८० पासून तों इ०सन ३०४पर्यंत असणें संभवनीय आहे. पण त्यांचा स्थानिक लेख मिळेपर्यंत त्यांचा अंमल तेथें होताच असें गृहीत धरितां येत नाहीं. त्यांचीं नाणीं चालत असें मानण्यास हरकत नाहीं; पण जसें शिवछत्रपतींच्या मुलुखांत मोगल, विजापूरचे बादशाह वगैरेंचीं नाणीं चालत त्याप्रमाणें क्षत्रपांचीं तेथें प्रचारांत नसतीलच असें नाहीं. कऱ्हाड व्यापाराचें मोठें शहर असावें. तेव्हां तेथें बहुत प्रकारचीं चलनी नाणींहि असणें संभवनीय आहे. सहदेवाच्या वेळीं कोणाचें राज्य होतें हें सांगवत नाहीं; पण तें बलाढ्य नव्हतें.

"कऱ्हाड" कुंतल देशांत कांहीं काल मोडत असलें पाहिजे. "कुंडल", "कुंडलवाडी" वगैरे कुंतल याचींच प्राकृत अथवा अपभ्रष्ट रूपें[1] असावींत. या भागावर वाकाटकांचा म्हणजे भोजांचा त्या वेळीं अम्मल असावा. वाकाटकांसच भोज ही संज्ञा असावी असें डॉ० कृष्णस्वामी आय्यंगार यांनीं दाखविलें आहे[2].

इ० सन ६०० ते ९०० पर्यंतच्या अंधकाराच्या कालाविषयीं विधान करणें धाष्टर्याचें आहे. पण चालुक्यांचा सार्वभौम अम्मल कऱ्हाड प्रांतावर असावा. आम्हांस खानापुरचे रा० दादासाहेब माने यांच्या येथें उपलब्ध झालेल्या इ०सनाच्या सहाव्या, सातव्या शतकांतील माधव-वर्म्याच्या ताम्रशासनांत रेट्टूरक म्हणजे[3] रेठरें बुद्रुक या कऱ्हाड तालुक्यांतील कऱ्हाड-

---

1. Journal of Indian History, Vol. V, Part III, Serial No. 15, p. 403; स्वकुळ-साळी-विजय, (सम्राट् समुद्रगुप्त याची स्वारी महाराष्ट्राबाहेरून झाली काय ?) वर्ष ६, अंक ८, मे १९२७.

2. Dr. S. Krishnaswami Aiyangar. The Vākāṭakas in Gupta History, p. 7.

3. J. R.A.S., Rethare Budruk Plates of Mādhava-varman, April 1928, pp. 400-402.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचें त्रैमासिक, वर्ष ८, अंक ३, पृष्ठ १६४.

पासून आठ मैल असलेल्या गांवाचा व बेलवाटिका, कोलिकावाटिका आणि वट्टरिका या त्या वेळच्या त्याच्या वाड्यांचा उल्लेख आहे. त्यांचीं हल्लींचीं रूपें रेठरें (बुा), बेलवडें, कोळें व वाठार हीं होत. नदीचें नांव कृष्णा-बेण्णा (कृष्णा-वेण्णा[1]) असें आलें आहे. ज्या अर्थीं वरील गांवावर या माधव-वर्म्याचा अम्मल होता त्या अर्थीं कऱ्हाडवरहि तो राज्य करीत असावा. त्याचें नांव आजपर्यंत अज्ञात होतें. तो कदाचित् चालुक्यांचा मांडलीक असेल. पण तो जवळ जवळ स्वतंत्र असावा; कारण तो आपणांस कोणाचाहि महामण्डलेश्वर वगैरे म्हणवीत नाहीं.

राष्ट्रकूट निःसंशय कऱ्हाडवर राज्य करीत होते.

या घराण्यांतील दुसऱ्या दन्तिदुर्गाच्या कोल्हापुर प्रांतांतील सामनगड येथील शके ६७५ (इ० सन ७५३)च्या ताम्रपटांत प्रस्तुत गांवाचा उल्लेख करहाटक असा आला आहे[2]. याच कुलांतील तिसऱ्या गोविंदाच्या भा० इ० सं० मंडळाच्या संग्रहीं असलेल्या ताम्रपटांत देणगी दिलेल्या व्यासभट्ट नांवाच्या एका ब्राह्मणाच्या राहाण्याच्या ठिकाणाचें नांव "करहड" असें दिलें आहे. हें करहाडक याचें थोडक्यांत उच्चारावयाचें रूप होय हें उघड आहे. यावरून शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांचें वास्तव्य तेथें असे हें उघड दिसतें. हें दानपत्र शके ७३२ वैशाख शुद्ध पौर्णिमेचें म्हणजे इ० सन ८१० एप्रिल २३चें आहे.[3] या वेळेपासून कऱ्हाडास राहाणाऱ्या ब्राह्मणांस करहड ब्राह्मण किंवा कऱ्हाडे ब्राह्मण म्हणण्याचा परिपाठ पडला असल.

पहिल्या अमोघवर्ष सम्राटाच्या शके ७९३च्या (इ०सन ८७१च्या) संजानच्या ताम्रशासनांत "करहड[3]" या शहराहून अथवा बहुधा प्रांताहून त्या बाजूस गेलेल्या बह्वृच शाखेच्या नरसिंह दीक्षित, रक्षादित्य–क्रमवित्,

1. Dr. Fleet. Dynasties of the Kanarese Districts of the Bombay Presidency, p. 101, foot note 2.

2. Journal of Indian History, Vol. IV, Part II, September 1925, pp. 100-102 यांवर आम्हीं प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या गोविंदाच्या ताम्रपटाचा सारांश.

3. Ep. Ind., Vol. XVIII, pp. 249-250.

त्रिविक्रम–षडङ्गवित्, केशव गहियसहास या चार ब्राह्मणांचीं नांवें आहेत. यावरून कन्हाड गांवांतील किंवा प्रांतांतील ब्राह्मणांची लाट वगैरे देशांत विद्वानांत गणना होई किंवा ते विद्वान् म्हणून बोलावून नेत असें दिसतें.

कन्हाड येथें सांपडलेल्या व कै० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं एपिग्राफिआ इंडिका या त्रैमासिकांत संपादिलेल्या राष्ट्रकूट घराण्यांतील तिसऱ्या कृष्णराजाच्या एका ताम्रपटांत कन्हाडचें नांव "करहाट" असें दिलें आहे. त्या लेखांत तो विषय म्हणजे जिल्हा असल्याचें नमूद केलें आहे. करहाटाच्या ईशानाशिवाचा विद्यार्थी गगनशिव यास वर निर्दिष्ट केलेलें दानपत्र दिलेलें आहे. ही देणगी तेथें राहून तपश्चरण करणाऱ्या लोकांसाठीं दिलेली आहे. ही दिल्याची तिथि गतशके ८८० कालयुक्त संवत्सरे फाल्गुन वा १३ बुधवार म्हणजे इ० सन ९५९ मार्च ९ ही होय.[1] हींतील मजकुरावरून कन्हाडास बहुश्रुत व विद्वान् ब्राह्मण असून तेथें शिवपूजा त्या वेळीं प्रचलित होतीसें दिसतें.

या कालानंतर कन्हाडप्रांतावर शिलाहार व सिंद या कुलांतील राजे राज्य करूं लागले. शिलाहारांचा इतिहास चांगला उपलब्ध आहे. पण सिंद कुलांच्या शाखांची अशी गोष्ट नाहीं. तीन प्रसिद्ध आहेत. एकींतील पुरुष एरंबरेज येथें चालुक्यांचे महामण्डलेश्वर म्हणून असत. यांपैकीं दुसऱ्या आचुगीनें शिलाहार कुलांतील पहिल्या भोजानें त्याचे मुलखावर स्वारी केली तेव्हां त्यास जर्जर केलें. त्यानें भोजास गिळून नंतर ओकल्याचें वर्णन आहे.[2] पण यावरून त्यानें त्याचा पराभव केला व त्यास आपल्या राज्यांतून हांकून लाविलें एवढेंच सिद्ध होतें. ही गोष्ट इ० सनाच्या १०९८–९९च्या सुमारास झाली. भोजास त्यानें ओकला त्याअर्थी त्याचें कन्हाडप्रांताचें वगैरे राज्य त्यानें बळकाविलें नाहीं असें दिसतें.

सिंध देशाच्या धरणेन्द्राच्या वंशजाचें राज्य बागडगे अथवा बागलकोट

1. Ep. Ind., Vol IV, pp. 278-279.

2. Dynasties of the Kanereae Districts of the Bombay Presidency by Dr. Fleet, pp. 51, 96.

3. Ibid, 104.

जवळील भैरन्मट्टीवर इ० सन १०६९–१०७६ च्या[1] सुमारास होतें. तथापि या शाखेतील पुरुषांनीं कऱ्हाडपर्यंत पराक्रम गाजविला असेलसें दिसत नाहीं. तिसऱ्या एका शाखेचा उल्लेख इ० सन ११६९ च्या सुमारास हरिहरच्या लेखांत आला आहे.[2] त्यांत या सिंदांचा पूर्वज शिव व सिंधु नदी यांच्या संभोगापासून उत्पन्न झाला व त्यास नागराजानें वाघिणीच्या दुधावर वाढविला असें वर्णन आहे. हे सिंद मूळ सिंध प्रांतांतून आले असावेत. वरील लेखांत असेंहि म्हटलें आहे कीं, या सिंदांच्या पूर्वजास करहाट प्रांत त्याचें वास्तव्याचें ठिकाण व्हावयाचें आहे असें सांगितल्यावर तो तेथें गेला. तेथील राजास त्यानें हांकून दिलें, स्वतःच्या बाहुबलावर मुलूख पादाक्रान्त केला व चार हजार शहरें व गांवें असलेल्या करहाट प्रांताच्या पुष्कळ जिल्ह्यांवर राज्य केलें.[3] इ० सन ११६९ हें वर्ष अंदाजानें दिलें असल्यामुळें या सिंदाचें राज्य कऱ्हाड प्रांतावर नक्की कधीं होतें अथवा कोठपासून कोठपर्यंत होतें तें कळण्यास मार्ग नाहीं. तरी तें शिलाहारांच्या पूर्वी असावें असें दिसतें. सिंदांचा तेथें एखादा लेख मिळल्याविना या वादाचा निर्णय होणार नाहीं. तथापि अंदाज म्हणून वरील विधान करणें अयोग्य नाहीं. कऱ्हाडास व कऱ्हाड तालुक्यांत " शिंदे " आडनांवाचे मराठ आहेत ते या सिंदांचे वंशज असणें संभवनीय आहे.

स्कंदपुराणान्तर्गत कृष्णा-माहात्म्य छापिलेलें आहे[४]. त्यांतील १९व्या अध्यायांत " करहाट-क्षेत्र-संगमाचें " वर्णन आहे. त्यांत " कृष्णवेणी " (कृष्णावेण्णा) व ककुद्मती (कोयना) यांची प्रीतीनें मध्यदेशांतल्या कोणा एका ब्राह्मणाच्या पुत्रांनीं स्तुति केल्याचें लिहिलें असून ककुद्मती व कृष्णा-वेण्णा यांच्या संगमांत स्नान केल्यानें त्याचें फल मिळतें असें सांगितलें आहे. यांत ब्रह्मा, हरि व नीलगल म्हणजे शंकर जलरूप धारण करून नित्य राहातात

1. Ep. Ind. Vol. III, p. 231.

2. Pālī Sanskrit and Old Kanarese inscriptions, No 119, and Mysore Inscriptions, p. 60.

3. Ep. Ind., Vol. III, pp. 231-232.

४. श्रीक्षेत्र वांई येथील विराज-वैभव छापखान्यांत शके १८०७, कार्तिक शुद्ध १२स छापिलेलें.

असें म्हटलें आहे. त्याच अध्यायांत संगमेशाचा म्हणजे संगमेश्वर महादेवाचा उल्लेख आहे. तसेंच भगवती, दुर्गा, दुर्दैत्यनाशिनी लक्ष्मी हिचा उल्लेख आहे. दुर्गा हें लक्ष्मीचें उग्र रूप आहे हें आपणांस इतर ग्रंथांवरून माहीत आहे. तीस येथें वाईट दैत्यांचा नाश करणारीण असें दाखविलें आहे[1]. हल्लीं कऱ्हाडास दैत्यनाशिनीचें किंवा दैत्यनिवारिणीचें देवालय कोयनेच्या पुलाजवळ आहे; पण तें प्राचीन नाहीं. प्राचीन आसपास कोठें गडप झालें असेल तें कळत नाहीं.

'कऱ्हाडमाहात्म्या'च्या संस्कृत हस्तलिखित प्रती क्वचित् उपलब्ध होण्यासारख्या असून त्यांत संगमापासून फरशीपर्यंतच्या तीर्थांचे व हाटकेश्वरासंबंधींचे उल्लेख आहेतसें ऐकितों. पण तें माहात्म्य नक्की केव्हां लिहिलें वगैरे माहिती प्रकाशण्यास प्रत्यक्ष त्याची प्रत हातीं आल्यावांचून मार्ग नाहीं. तरी तें कृष्णामाहात्म्यानंतर रचिलेलें असावें. मराठींतहि कऱ्हाड "माहात्म्य" मूळ संस्कृत माहात्म्यावरून लिहिलेलें आहे. आम्हांस मिळालेल्या हस्तलिखित प्रतींत २१ अध्याय आहेत. १ गरुड, २ हाटकेश्वर, ३ भैरव, ४ गणेश, ५ नाग, ६ कमलेश्वर, ७ नृसिंह व ८ मार्कंडेय हीं कऱ्हाडचीं अष्ट तीर्थें होत. माहात्म्यांतील वर्णनावरून त्या वेळच्या कऱ्हाडचे रस्ते विस्तृत व रुंद असून तेथें चौक वगैरे होतेसें दिसतें. हवेल्यांच्या दारांस खडे वगैरे लावून तीं सुशोभित करीत.

बरींच स्कंदपुराणान्तर्गत समजलीं जाणारीं माहात्म्यें इ० सनाच्या १०व्या ११व्या शतकांत रचिलीं गेलीं. त्यांचा काल १३व्या शतकापलीकडे जात नाहीं.

श्रीक्षेत्र काशीप्रमाणें यात्रेकरूंस कऱ्हाडास पंचक्रोशी करावी लागे. पांच कोसांत दैवतें होतीं. कऱ्हाडास दक्षिण काशीच म्हणत. एका मंगलाष्टकांत विश्वेश म्हणजे हल्लींच्या समजाप्रमाणें श्रीकृष्णाबाईचे समोरील काशीविश्वेश्वर व कमलेश्वर म्हणजे हल्लींचे समजुतीप्रमाणें कर्देपिराजवळील महादेव यांस उल्लेखितात. यांतच कऱ्हाडास आदिक्षेत्र गणिलें आहे. दुसऱ्या एका मंगला-

---

१. स्नात्वा तत्र समभ्यर्च्य संगमेशं प्रयत्नतः ॥
दृष्ट्वा दुर्गां भगवतीं लक्ष्मीं दुर्दैत्यनाशिनीं ॥ २१ ॥

ष्टकांत हाटकेश्वराचें नांव आहे. वरील तिन्ही देवळें प्राचीन नाहींत. परंतु कदाचित् काशीविश्वेश्वर व कमलेश्वर यांचीं मंदिरें पुरातन देवळांचेच जागांवर बांधिलीं असल्यास न कळे! हल्लींचें हाटकेश्वराचें देऊळ तर नवेंच असून पुरातन हाटकेश्वराचे जागींहि नाहीं. प्राचीन मंदिर नदीचे कांठीं होतें म्हणतात.

आम्हांस उपलब्ध झालेल्या किमिया, औषधोपचार वगैरेंवरील पोथींतील उतारा आतां देतों :

"अथ मयूरगिरिकल्पः अथ दक्षिणपथे करहाटं नाम पत्तनमस्ति तत्पश्चिमभागे मयूरगिरिपर्वतस्तिष्ठति."

उत्तम मयूरगिरि आहे. दक्षिणेच्या रस्त्यावर करहाट नांवाचें राजधानीचें (अथवा मोठें) शहर आहे. त्याच्या पश्चिमभागीं मयूरगिरि (नांवाचा) पर्वत आहे.

वरील पोथी रचिली तेव्हां करहाट दक्षिणेच्या रस्त्यावर होतें म्हणजे दाक्षिणेंत जाणारा मोठा रस्ता त्या शहरावरून जाई हें उघड होतें. अर्थात् त्यास स्वाभाविक महत्त्व होतें. करहाटाच्या पश्चिमभागीं मयूरगिरि असल्याचा उल्लेख आहे. तेव्हां तो पाटण तालुक्यांतील मोरगिरि होय हें निर्विवाद आहे. करहाटास पत्तन म्हटलें आहे. हा शब्द प्रायः राजधानीस लावीत. पण क्वचित् तो मोठ्या शहरांससुद्धां लाविलेला आहे. पहिल्या अमोघ वर्षाच्या ताम्रपटांत संजानास पत्तन[1] शब्द लाविला आहे. तेव्हां "पत्तन" शब्द आला कीं तीं राजधानी असलीच पाहिजे असें म्हणवत नाहीं. तेव्हां या वेळीं क-हाड राजधानीचें शहर असणें संभवनीय आहे एवढेंच आपण म्हणूं.

इ० सनाच्या अकराव्या व बाराव्या शतकांत क-हाड, कोल्हापूर व वाळवें या प्रांतांवर शिलाहारांच्या एका शाखेचा अंमल होता. या कुलांतील शके ९८०च्या पौष शुद्ध सप्तमीस उदगयन पर्वणीस खिळिगिळदुर्गाहून[2] दिलेल्या मारसिंह राजाच्या ताम्रपटांत क-हाडचें नांव "करहाट" आलें आहे. करहाटप्रांत त्याच्या ताब्यांतील प्रांतापैकीं एक होता. करहाट, कुण्डी,

---

१. अयं ग्रामस्य संजाने पत्तने, Ep. Ind., Vol XVIII, p. 250.

2. Ep. Ind., Vol VII, p. 56, No. 315, Jour. Roy. As. Soc., Vol IV, p. 281; Cave Temples of West. India, p. 102.

मिरिंज (मिरज) व (उत्तर) कोंकण या प्रांतांवर तो राज्य करी. गोंकन, अंककार व गुहेयनसिंग असेंहि यांस संबोधीत. डॉ० फ्लीट यांच्या मतें चंद्रलेखा याचीच पुत्री असावी.[1] रा० ब० चिं. वि. वैद्यांस हा तर्क संभवनीय वाटतो.[२] हिचें स्वयंवर पश्चिम चालुक्य शककर्ता सम्राट सहावा विक्रमादित्य याजबरोबर करहाटास (कऱ्हाडास) झालें. त्याचें रसभरित वर्णन विक्रमादित्याचा दरबारी कवि काश्मिरी पण्डित विद्यापति बिल्हण यानें विक्रमाङ्कदेवचरितांत केलें आहे. "विद्यापति"[३] ही या कवीची सार्थ पदवी होती. यानें वरील चरिताच्या आठव्या सर्गांत या करहाटपतीच्या पुत्रीचें, विद्याधर कुमारीचें, विद्याधर राजकन्येचें, चंद्रलेखेप्रमाणें शोभा असलेलीचें, बिम्बोष्ठीचें, गौर्याङ्गीचें, कुरङ्गशावाक्षीचें, स्तनभारोन्नतीचें, विस्तीर्ण चक्षुषीचें, उत्सारितभुजेचें, कामानें तूणीवाधोमुखीकृता जिची नासिका आहे तिचें, स्मितमुखीचें, लीलारसांच्या परिपाकभूमीचें[४], कान्तीनें जिनें चन्द्रास दारिद्र आणिलें तिचें हृदयङ्गम वर्णन केलेलें आहे. विक्रमादित्यास त्यानें कर्णाटपृथ्वीपति, चालुक्यभूपालकुलप्रदीप, कुन्तल—कामदेव, कुन्तल—चक्रवर्ती वगैरे यथार्थ विशेषणें लाविलेलीं आहेत. त्याच्या कवित्वाच्या प्रभावास या स्वयंवरामुळें अवसर मिळाला आहे व वाचकांस त्यानें थक्क करून सोडिलें आहे. त्यांत शतशः नृप आल्याचें वर्णिलें आहे ती अतिशयोक्ति होय. पण त्यास चेदिराज, कालिंजर—भूधर, मालवेन्द्र, गुर्जरेन्दु, प्रकामोन्नत—चारुदेह असा पाण्ड्य, चोलमहीपति सोमेश्वर वगैरे राजे आलेले असावेत. सर रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर यांनीं लिहिलें आहे कीं, हें स्वयंवर खरोखरी झालें किंवा हें आपल्या वर्णनशक्तीचा प्रभाव दाखविण्यास कवीनें

---

1. Dynasties of the Kanarese Districts of the Bombay Presidency, p. 104.

२. मध्ययुगीन भारत, भाग ३, पृष्ठ ४३७.

३. चालुक्येन्द्राद्लभत कृती योत्र विद्यापतित्वम्—विक्रमाङ्कदेवचरित, सर्ग १८, १०१.

४. या वर्णनांतील कांहीं विशेषणें सर्वसाधारण वाचकांस किंचित् कठीण वाटतील; पण त्यांचें भाषांतर केल्यास मूळांतील स्वारस्य जाईल म्हणून तीं कवीच्याच शब्दांत दिलीं आहेत.

कल्पिलें याविषयीं शंका येते.[1] रा०ब० वैद्य म्हणतात:—"पण हें वर्णन अनैतिहासिक दिसतें. कारण स्वयंवराची चाल या वेळेस बंद पडली होती. शिवाय दक्षिणचा सम्राट् विक्रम खुद्द जेथें वर उपस्थित झाला तेथें कन्येस दुसरा एखादा राजा वरणें शक्यच नव्हतें."[2] या विक्रमाङ्कदेवचरिताच्या नवव्या सर्गांतील चित्ताकर्षक, स्वाभाविक व सुंदर वर्णन एक वेळ संस्कृतांतूनच वाचण्याची वाचकवर्गास आम्ही जोराची शिफारस करितों. सर रामकृष्ण भांडारकरांस संशय आला तर रा०ब० वैद्यांनीं हें स्वयंवर अनैतिहासिक व अशक्यच ठरविलें. बिल्हण हा राजदरबारी कवि असून "विद्यापति" ही त्यास सार्थ पदवी होती. विक्रमादित्यापुढें त्यास हा सर्ग म्हणून दाखवावयाचा होता अथवा वाचावयाचा होता. तेव्हां सर्वच कल्पित स्वयंवर त्यानें गाऊन दाखविलें असेल व असें करण्यानें कुन्तलचक्रवर्ति खुष झाला असेल हें संभवनीय नाहीं. वस्तुस्थिति अशी दिसते : वरील लग्न स्वयंवर पद्धतीनें झालें, यांत विशेष नाहीं. हल्लीं देखील (खरा प्रकार अगदीं निराळा असतां म्हणजे नवराच नवरीस निवडीत असतां) चां. का. प्र.त वगैरे लग्न स्वयंवरपद्धतीनें होतें. विक्रमाच्या वेळीं याचा सोहळा जास्त स्वयंवर थाटावर असलाच पाहिजे. लग्न कोणाबरोबर होणार हें जरी अगदीं अथवा जवळ जवळ निश्चित झालें असलें तरी स्वयंवराचे सर्व रिवाज पाळीत. करहाटपतीनें आपले मांडलिक स्वयंवरास पाचारिलेच असतील. त्यांस वरणें चंद्रलेखेस विक्रम हजर असतां शक्यहि नसेल. पण त्याबरोबरच वरील देशांचे राजांस आमंत्रण दिलें असेल. त्यांपैकीं कांहींस चंद्रलेखा आपली पट्टराणी करावी अशी इच्छा असेल व करहाटपतीस त्यांस झिट्कारण्याचें सामर्थ्य नसेल; कारण तो महामण्डलेश्वरच होता. तेव्हां पूर्वीच्या क्षत्रिय पद्धतीप्रमाणें हें स्वयंवर थाटलें म्हणजे ही अडचण दूर होऊन अनायासेंच कन्येस अनुरूप वर मिळेल असें त्यास वाटलें असावें. विक्रम आपल्या लवाजम्यासह हजर असल्यावर दुसऱ्यास चंद्रलेखा मला द्या हें म्हणणेंच संभाव्य नव्हतें. तेव्हां मांडलिकांबरोबरच खालीं तोंडें घालून तिला

1. Early History of the Deccan, p. 86.

२. मध्ययुगीन-भारत, भाग ३, पृष्ठ ३८७–३८८.

पट्टराणी करण्याची इच्छा असलेले नृपति परत गेले असावेत व त्याचमुळें कवीस आपल्या सम्राटाचें मनोरंजन करण्याची व त्या राजांचा उपहास करण्याची सहजच संधि मिळाली असावी.

चंद्रलेखेस प्राचीन लेखांतून चंदलदेवी म्हटलेलें आहे. बिल्हाणानेंहि ११व्या सर्गांत हें नांव दिलें आहे.[१] हिच्या अनुपम सौंदर्याची कीर्ति सर्व हिंदुस्थानभर पसरलेली होती. ही काश्मीरच्या हर्ष राजाच्या कर्णपथावर गेली तेव्हां कर्नाट जिंकून चंद्रलेखेस हरण करण्याची प्रतिज्ञा त्यानें भर सभेंत केली.[२] पण हल्लीं कऱ्हाडच्या बाजूस काश्मीरच्या नव्हे पण पंजाबांत राहिलेल्या सामान्य माणसाचेंहि मन हरण करणारें सौंदर्य दृष्टीस पडत नाहीं!

कांहीं झालें तरी या चंद्रलेखेच्या स्वयंवरास अथवा लग्नास दूरदूरचे राजे प्राप्त झाले होते हें उघड आहे. इतक्यांच्या सेनासमुद्राचा व लवाजम्याचा थाटानें समावेश होण्यास तशाच योग्यतेचें शहर हवें होतें. तेव्हां करहाट फार भरभराटीचें व महत्त्वाचें ठिकाण असलें पाहिजे. तें दक्षिणेच्या वाटेवर असल्यामुळें त्यास स्वाभाविक महत्त्व होतें. तेथें उपवनेंहि असावींत. मोठमोठ्या हवेल्या असाव्यात. रा० ब० वैद्यांच्या मतें शिलाहारांची राजधानी कऱ्हाड होती.[३] तथापि डॉ० फ्लीट म्हणतात कीं, "कऱ्हाड" त्यांची राजधानी असल्याचा उल्लेख कोठेंहि नाहीं.[4] बिल्हणानें "करहाटपति" हा शब्द योजिला आहे. तेव्हां चंद्रलेखेच्या बापाचें (मारसिंहाचें) राज्य करहाटावर होतें यांत शंकाच नाहीं. पृष्ठ ३१ पादटीप १ वरील उताऱ्यांत "पत्तन" हा शब्द आला आहे. त्यावरून व स्वयंवराच्या वर्णनावरून करहाट ही शिलाहारांची मुख्य, दुय्यम अथवा तिसऱ्या दर्जाची किंवा निदान विहार वगैरे करण्याची वर्षांतून कांहीं महिन्यांची तरी राजधानी असावी असें वाटण्याकडे प्रवृत्ति होते. मारसिंह आपणांस फक्त महामण्डलेश्वर म्हणवी. कोल्हापूर, पन्हाळा, वाळवें या

१. तत्पसद्मनि जगाम स सार्धं कुन्तलेन्दुरथ चन्दलदेव्याः ॥ ६८

२. राजतरंगिणी, ७, ११२४.

३. मध्ययुगीन-भारत, भाग ३, पृष्ठ ४३६.

4. Dynasties of the Kanerese Districts of the Bombay Presidency, p. 10.

शिलाहारांच्या राजधान्या होत्या. तेव्हां आणखी एक राजधानी असेल किंवा नाहीं अशी प्रथम शंका येते. पण करहाटक चालुक्यांच्या सार्वभौम सत्तेला जवळ पडत असल्यामुळें, शिलाहार महामण्डलेश्वरांस वरील दूरच्या राजधान्या स्थापाव्या लागल्या असतील. डॉ० बुह्लर म्हणतात कीं, शिलाहारांच्या एका शाखेची राजधानी करहाट होती.[1] या शाखेंतील पहिल्या भोजानें शके १०२० च्या सुमारास पश्चिम चालुक्य ६वा विक्रमादित्य याचा मांडलिक महामण्डलेश्वर सिंद कुलांतील दुसरा आचुगी याचे प्रांतावर स्वारी केली; पण त्यांत त्याचा पराभव झाला. आचुगीनें त्यास गिळून नंतर ओकल्याचें वर्णन आहे. यावरून कदाचित् भोजाच्या करहाट प्रांताचा कांहीं काल त्यानें अपहार केला असेंहि होईल. पण त्यास ओकला त्याअर्थी त्या प्रांतावर आचुगीचा कायमचा अंमल बसला नाहीं हें खास.

या शिलाहारांच्या शाखेंतील सर्वांत प्रसिद्ध राजा विजयादित्य होय. याचे शके १०६४ ते १०७९[2] (इ०सन ११४२–११५४) चे लेख प्रसिद्ध आहेत. कोल्हापुरास महालक्ष्मीचें देवालय आहे. त्याच वेळेच्या दुसऱ्या एका महालक्ष्मीच्या देवालयाचे अवशेष कऱ्हाडास इतस्ततः पहावयास मिळतात. विजयादित्य महालक्ष्मीच्या प्रसादानें आपणास वैभव प्राप्त झालें असें मानी. हा जैन धर्माचीहि वाखाणणी करी. यानें ठाण्याच्या शिलाहार राजास राज्य परत मिळविण्याचे कामीं मदत केली.[3] तसेंच गोंव्याच्या राजास यानें पुनरपि सिंहासनावर बसविलें.[४] यानें करहाट (कऱ्हाडे) ब्राह्मण नरसिंहभट सत्यवादी (सुप्रसिद्ध रियासतकार रा० सा० गोविंदराव सरदेसाई यांचा पूर्वज) यास दक्षिण कोंकणांतील संगमेश्वर गांव इनाम दिला.[५]

जैन गुरु मल्लिषेणमलधारिदेव याच्या स्मरणार्थ श्रावण-बेळ्-गोळ येथें

1. Introduction to the Vikramāṅka-devacharita, p. 40, note.

2. Dynasties of the Kanarese Districts of the Bombay Presidency, p. 105.

3. Early History of the Deccan, p. 123.

४. मध्ययुगीन-भारत, भाग ३, पृष्ठ ४३४.

५. कै० वि. का. राजवाडे, कऱ्हाड्यांचें दक्षिण कोंकणांतील प्राचीनत्व.

समन्तभद्र - आप्तमीमांसा नावाचा ग्रंथ;



शके १०५० (इ० सन ११२९) नंतर एका पिढींत उभारलेल्या[1] स्तम्भावरील मल्लिनाथानें केलेल्या प्रशस्तींतील समन्तभद्रानें (बहुधा करहाटच्या राजास) म्हणून दाखविलेल्या पद्यांत तो पटणा, माळवा, सिंधु, पंजाब, काञ्ची, विदिश वगैरे टिकाणीं हिंडून "बहुभट, विद्योत्कट व संकट[2]" म्हणजे पुष्कळ योद्धे असलेल्या अथवा मोठमोठे पण्डित असलेल्या,[3] विद्यासंपन्न व दाटी असलेल्या करहाट शहरांत वादासाठीं येऊन पोहोंचल्याचें वर्णन आहे. तेथील राजा जैनधर्मास मदत करणारा असल्यामुळें या जैन मुनीनें तेथें जाणें स्वाभाविक होतें. वरील कथनावरून तेथें पुष्कळ शूर सैनिक अथवा मोठमोठे पण्डित व विद्यासंपन्न लोक रहात आणि गचडी असे हें सिद्ध होतें.

विजयादित्याचा पुत्र दुसरा भोज जवळ जवळ स्वतंत्रच असे. यास वीर भोजदेव संबोधीत. हा बहुधा प्रणालक म्हणजे पन्हाळा येथें राही. हीच याची मुख्य राजधानी होती म्हटलें तरी चालेल. यास पश्चिमचक्रवर्ती- हि संबोधिलेलें आहे. याचा गत शके ११९२ साधारण संवत्सर पुष्य (पौष) बहुल द्वादशीचा (मंगळवार, २९ डिसेंबर इ० सन ११९०चा) कोल्हापुरच्या टाउन हॉलांत एका दगडावर लेख आहे. त्यांत एडेनाडांतील कोप्परवाडगांवांत आपल्या राज्याच्या वृद्ध्यर्थ डॉ० किलहार्ननें भाषांतर केल्या- प्रमाणें करहाटाच्या आदित्यभट्ट, लक्ष्मीधरभट्ट, प्रभाकर थैसास यांस[4] अथवा सर रामकृष्ण भांडारकर यांनीं भाषांतर केल्याप्रमाणें करहाटकाच्या आदित्य- भट्ट व लक्ष्मीधरभट्ट यांस अथवा रा० का. ना. दीक्षित, एम्. ए., यांनीं भाषांतर केल्याप्रमाणें प्रभाकर थैसास व वासुदेव थैसास या कऱ्हाडे[5] ब्राह्मणांस

1. Ep. Ind., Vol. III, p. 185.

२. *वृत्त *पूर्व्वं पाटलिपुत्रमध्यनगरे भेरी मया ताडिता
पश्चान्माळवसिन्धुठक्कविषये कांचीपुरे वैदिशे [।* ]
प्राप्तोहं कारहाटकं बहुभटं [विद्यो]त्कटं संकटं
वादार्थी विचराम्यहन्नरपते शार्दूलविक्रीडितं ॥ [७* ]
--Ibid, p. 190.

३. रा० का. ना. दीक्षित, एम्. ए., यांचें भाषांतर.

4. Ep. Ind., Vol. III, p. 214.

५. रा० का. ना. दीक्षित, एम्. ए., यांचें तारीख २८-११-२८चें पत्र.

एक शेत, घर व खडवलक अमृतेश्वरमूर्ति उमामहेश्वर देवाच्या पंचोपचार पूजे-साठीं यानें दिल्याचें लिहिलें आहे. रा०ब० वैद्य म्हणतात कीं, येथें कऱ्हाटक (मुळांत करहाटक आहे) हा शब्द ब्राह्मणउपजातिवाचक स्पष्ट आहे.[1] कै० सर रामकृष्ण भांडारकरांनीं असें दाखविलें आहे कीं, कऱ्हाडे ब्राह्मणांची जात त्या वेळीं मानीत असत.[2] प्रथमावृत्तींत आम्हीं कऱ्हाडे ब्राह्मणांस नांव याच गांवावरून (करहाटावरून) पडलेलें उघड दिसतें असें विधान केलें होतें. त्या वेळीं आमचे कांहीं मित्र हें मत मि० एन्थॉव्हेन यांच्या मताशीं विसंगत आहे म्हणून रुष्ट झाले होते. पण आमचे म्हणण्यास मि० फरग्युसन, सर रामकृष्ण व रा०ब० वैद्य यांच्या मतांचा दुजोरा आहे हें लक्षांत येईल. मि० एन्थॉव्हेन साहेब म्हणतात:—"हे ब्राह्मण सातारा, पुणें, कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांत व सावंतवाडी संस्थानांत असून इ० सन १९०१ ची मोजणी झाली तींत पुरुष व बायका मिळून यांची लोकसंख्या ३२,४२६ भरली. कृष्णा व कोयना यांच्या पवित्र संगमाचें ठिकाण जें कराड (कऱ्हाड) शहर त्यावरून त्यांनीं हें नांव धारण केलें आहे. आपण ऋग्वेदी देशस्थ आहोंत असें ते सांगतात. त्यांच्या उत्पत्ती विषयीं निरनिराळ्या दंतकथा आहेत." आपणांस त्यांच्या उत्पत्तीविषयीं कांहीं कर्तव्य नाहीं. पण त्यांनीं नांव कराडा-वरून (करहाटावरून) घेतलें असें वरील उताऱ्यांत स्पष्ट आहे. वरील उताऱ्यापुढेंच एन्थॉव्हेन साहेबांनीं मुंबई गॅझीटीअर, ९, भाग एक, पृष्ठ ४९७-८ वरील कँबेल साहेबांच्या म्हणण्याचा उतारा दिला आहे. त्यांतील आपल्या विषयापुरता मतलब इतकाच कीं, कऱ्हाडे हें नांव पश्चिम दक्षिणेच्या सातारा जिल्ह्यांतील पवित्र कृष्णा व कोयना संगमावरच्या कराडा (कऱ्हाडा)वरून पडलेलें आहे. कऱ्हाडचें व कोल्हापुरचें जुनें नांव जवळ जवळ सारखेंच आहे. करहाट व करहाटक यांचें नांव क्षहत किंवा खगरत दिसतें व हें शक अथवा पह्लव नहपान ज्यानें इ० सनाच्या दुसऱ्या शतकाच्या सुरवातीपासून माळवा,

---

१. मध्ययुगीन-भारत, भाग ३, पृष्ठ १५९.

2. "Two of the Grantees in one case at Kolhāpur are called Karahāṭakas which shows that their Caste of Karhāḍe Brāhmans had come to be recognized." —Early History of the Deccan, p. 124.

कोंकण व कराडपर्यंतची दक्षिण काबीज केली त्याच्या घराण्याचें नांव होय'. त्याच्या नाण्यांवरची गदा परशुरामाची गदा समजून तीवरून आख्यायिका पसरलेल्या आहेत. त्याच्या नाण्यांवरील बाणानें परशुरामानें बाण सोडून कोंकण समुद्राबाहेर काढिलें या कथेशीं संबंध जोडिला आहे. कऱ्हाडे ब्राह्मणांनीं कऱ्हाडवरून नांव घेतलें. यावरून परकीय देशांतून ते आले असून त्यांस ब्राह्मण करून घेतलें. ते शकवंशीय किंवा पह्लववंशीय, क्षहरात, खखरात यांचें वंशज आहेत व कुंभारली घाटानें ते चिपळूण राजापुराकडे गेले. हें सांगून रत्नागिरीचे कऱ्हाडे ब्राह्मण गुजरवंशीय आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.[1]

तथापि खरें पाहतां नहपानाच्या घराण्याचें नांव " क्षहरात " होतें. त्याचें प्राकृतरूप " खखरात " होतें. यावरून कऱ्हाडास नांव पडलें असेलच असें म्हणवत नाहीं. बरें, पडलेंच असें गृहीत धरिलें तरी १२ व्या १४ व्या शतकांत " कऱ्हाड " गांवाकडचे किंवा प्रांतांतील जे ब्राह्मण कोंकणांत वगैरे गेले त्यांस कऱ्हाडे म्हणूं लागले असें लिहिण्यांत काय चुकी झाली हें आम्हांस समजत नाहीं. या वेळीं सर्वत्र ब्राह्मणांस गांवावरून व विशेषतः प्रांतावरून नांवें पडलेलीं आहेत. काश्मीरचे ते काश्मिरी, गुडाचे ते गौड, कनोज देशाचे ते कनोजिया, त्रिपूरचे ते तिवारी, वडनगरचे ते नागर,[2] दशपूरचे ते दसोरे, मिथिलेचे ते मैथिल व कऱ्हाडचे अथवा कऱ्हाड प्रांतांतील ते कऱ्हाडे. हीं नांवें एकदम रूढ होणें शक्य नाहीं. हळूहळू प्रचारांत आलेलीं असलीं पाहिजेत. वरील माहितीवरून ९व्या, १०व्या शतकापासून करहाटकच्या, करहडच्या, कऱ्हाडच्या ब्राह्मणांचा उल्लेख विद्वान् ब्राह्मणांत येतो हें सिद्ध होतें. त्यांची पूर्वीची कीर्ति रा० का. ना. दीक्षित, बखले, रा० सा० गोविंद-राव सरदेसाई वगैरेंनीं आजतागाईत कायम ठेविली आहे.

कऱ्हाडे ब्राह्मणांचा विस्तार कोंकण वगैरे इतर प्रांतांत मुख्यत्वें शिलाहारांचे वेळीं झाला. कोंकणांतील वगैरे लोक हे मूळचे तेथील रहिवासी

1. Enthoven, Tribes and Castes of Bombay, Vol. I, pp. 246-7.

२. मध्ययुगीन-भारत, भाग ३, पृष्ठ ५५४.

नसल्यामुळें व हे कऱ्हाडच्या शिलाहारांच्या राज्यांतून गेल्यामुळें यांस कऱ्हाडे संबोधूं लागले असतील. एकूण मूळ "खखरात"–"खरात" घराण्यावरून कऱ्हाडास नांव पडलेलें असो वा नसो, या गांवाच्या अथवा प्रांतांतील ब्राह्मणांस शिलाहारांच्या राज्याच्या वेळेपासून प्रामुख्यानें कऱ्हाडे म्हणूं लागले. रा० ब० वैद्य तर म्हणतात कीं, कऱ्हाडे (ब्राह्मण) कऱ्हाडच्या शिलाहारांच्या देशांत राहणारें[1] (ब्राह्मण) होत.

आतां "खखरात" "क्षहरात" यावरून "कऱ्हाड" नांव व्युत्पादणें निर्विवाद आहे किंवा काय हें पाहूं. नामसादृष्यापेक्षां व कुटाळ्या करण्याच्या दृष्टीनें इतर जातींच्या लोकांनीं रचिलेल्या आख्यायिकांपेक्षां यांत जास्त तथ्यांश असेल असें म्हणवत नाहीं. नहपानाच्या अगोदरचे लेख भरूत व कुडें येथें आहेत. उशीरांत उशीर निदान तत्कालीन आहेत. त्यांत नांव "करहकट", "करहाकड" किंवा "करहाकडक" येतें. "खखराटक" "खराट" येत नाहीं हा मोठा मुद्द्याचा प्रश्न आहे. तेव्हां वरील नहपानाच्या घराण्याच्या व त्याचे वंशज कऱ्हाडे यांच्या नांवावरून कऱ्हाड गांवास अथवा प्रांतास नांव पडलें हें म्हणणें ऐतिहासिक कसोटीस उतरत नाहीं. हें नांव वर दिल्याप्रमाणें नदीचे लगतच्या गांवावरून अथवा प्रांतावरून व्युत्पादिलें पाहिजे. क्षहरात, खखरात, क्षहत किंवा खगरत यांच्या कुलनामावरून कऱ्हाडास नांव पडलें नसून कऱ्हाडावरून (कऱ्हाड गांवावरून अथवा प्रांतावरून) कऱ्हाडे ब्राह्मणांस नांव पडलें आहे. असो.

जैनांस, कऱ्हाडे ब्राह्मणांस वगैरे दानें देणाऱ्या दुसऱ्या भोजाची सत्ता इतकी वाढली कीं, तो आपणांस पश्चिमचक्रवर्ति म्हणवून घेऊं लागला. पण हें त्याचें वैभव चिरकाल टिकलें नाहीं. त्यास यादव कुलांतील सम्राट् सिंघण यानें पादाक्रान्त करून त्याचा मुलूख आपल्या साम्राज्यांत सामील केला.

आमच्या या विधानास राजकोटच्या वॅटसन अजाबघराचे क्यूरेटर रा० डिसकळकर, एम्. ए., यांनीं आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात, "देवगिरीस जेव्हां यादवांचा पराक्रमी राजवंश राज्य करीत होता त्या वेळीं

१. मध्ययुगीन-भारत, भाग ३, पृष्ठ ५५४.

कऱ्हाडचा मुलुख त्याच्या राज्यांत सामील झाला असें जें रा० गुप्ते म्हणतात, तें सर्वथा बरोबर दिसत नाहीं. त्या काळीं कऱ्हाडास सिंद वंशाचे राजे राज्य करीत होते व ते यादवांचा अंमल मानीत होते असें दिसतें."[1] पण धारवाड जिल्ह्यांतील तिळिवळ्ळी येथील लेखांत सिंघणानें वरील पन्हाळ्याच्या भोजराजास जिंकिल्याचा उल्लेख आहे. सर रा. गो. भांडारकर आपल्या दख्खनच्या इतिहासांत लिहितात कीं, कोल्हापुरचें राज्य यादवांनीं आपल्या राज्यांत सामील केलेंसें दिसतें. यापुढें कोल्हापुरचे लेखांत यादव राजांचीं नांवें असून त्यांबरोबरच त्यांच्या सुभेदारांचीं नांवें येतात.[2] सिंघणानें भोजास पूर्णपणें जिंकून त्याचें मांडलिक राज्य आपल्या सार्वभौम राज्यास जोडिलें.[3]

शिलाहारांची कुलदेवता (कोल्हापुरची) महालक्ष्मी होती. कऱ्हाडासहि हिचें भव्य देवालय होतें. डॉ० फ्लीट यांच्या मतें हे शिलाहार जैनधर्मी होते.[4] या कुलांतील गण्डरादित्यानें आजरें येथें एक जिनाचें देऊळ बांधिलें व इरुकुडीच्या गण्डसमुद्रावर एक जिनाची मूर्ति बसविली.[5] जैनास यानें देणग्या दिल्या. पण यानें वरीलच तलावावर ईश्वर म्हणजे शिव व बुद्ध यांच्याहि प्रतिमा बसविल्या आणि जैनांखेरीज इतरांस देणग्या दिल्या. विजयादित्यानें उत्तर कोंकणांत ब्राह्मणांस इनामें दिलीं. दुसऱ्या भोजानें जैनांच्या व हिंदूंच्या देवळांस जमीनी दिल्या व ब्राह्मणांस देणग्या दिल्या. हे शिलाहार परमसहिष्णु होते. यांनीं जैनांस, जैनमंदिरांस व जैनमुनींना देणग्या दिलेल्या आहेत. तरी हे कोल्हापूरच्या व कऱ्हाडच्या महालक्ष्मीचे भक्त असल्यामुळें हे हिंदुधर्मीच मानणें सयुक्तिक होय. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर तर म्हणतात कीं, हे स्पष्ट रीतीनें पौराणिक व वैदिक धर्मानें चालणारे होते.[6] असो.

---

१. सहविचार, वर्ष ६, अंक ३, डिसेंबर १९२७, पृष्ठ १४२.

2. Early History of the Deccan, p. 108.

3. But Singhaṇa Subdued him completely and annexed the principality to the Yādava Empire—Early History of the Deccan p. 124.

4. Dynasties of the Kanarese Districts of the Bombay Presidency, p. 103.

5. Early History of the Deccan, p. 123.

6. "They were clearly the followers of the Purāṇic and Vedic religion." —Early History of the Deccan, p. 124.

विजयनगरच्या दुसऱ्या घराण्यांतील सदाशिव महारायाच्या शके १४७० च्या (इ० सन १५४८-च्या) कनुमाच्या ताम्रपटावरून [1] व विजयनगरच्या तिसऱ्या कुलांतील दुसऱ्या श्रीरंगरायाच्या शके १४९९ (इ० सन १५७६–७७च्या) अरिविलिमंगलाच्या ताम्रशासनावरून [2] असें दिसतें कीं, करहाटचे किंवा करहाट प्रांताचे राजे वरील विजयनगरच्या सम्राटांचे मांडलिक असावेत; कारण ते त्यांच्या द्वारपालांचें काम करून त्यांचे स्तुतिपाठ गात असत.

हे विजयनगरच्या सम्राटांचे मांडलिक कोण असावेत हें समजत नाहीं. दादो नरसिंह काळे यानें इ०सन १४२९चे सुमारास जरी ब्राह्मणी राज्याच्या तर्फे आबादानी करण्याचा प्रयत्न केला तरी ब्राह्मणी राज्याचीं शकलें जीं उडालीं त्यांत स्थानिक राजांनीं आपले हात वाहत्या गंगेंत धुऊन घेतले. शिलाहारांच्या पूर्वीच्या सिंदांची एखादी शाखा यादवांच्या साम्राज्याच्या अंताबरोबर पुन्हा पुढें येऊन विजयनगरचें सार्वभौम राज्य नष्ट होईतों मांडलिक अथवा बडे जहागीरदार म्हणून कऱ्हाडच्या बाजूस रहाणें अगदींच असंभवनीय नाहीं; पण या काळांतील सिंदांचा शिलालेख वा ताम्रशासन उपलब्ध झालें नाहीं. आम्हीं सातारच्या आपल्या भाषणांत दाखविलेंच आहे कीं, सातारा जिल्ह्याची पुराण-वस्तु-संशोधनाच्या दृष्टीनें मुळीं नीट पाहणीच झालेली नाहीं. कऱ्हाड तालुक्यांतीलहि बरेच लेख तपासावयाचे आहेत. तेव्हां लेखना लेख शोधून काढिल्यास कऱ्हाडच्या या इतिहासावर उजेड पडण्यासारखा आहे.

## मुसलमानी अमदानी.

मुसलमानी अमदानींत कऱ्हाडास "कलहराबाद" म्हणत. आदिलशाही एका सनदेंत "कल्हार" असाहि उल्लेख आहे.

---

१. कांबोजभोजकालिंगकरहाटादिपार्थिवैः।
सोविदंल्ल (सौविल्ल) पदं प्राप्ते (प्तैः) संदर्श (र्शि) तनृपोपदः। [४१].
Ep. Ind., Vol. XIX, p. 345.

२. कांबोजभोजकालिंगकरहाटादिपार्थिवैः।
प्रतीहारपदं प्राप्तैः प्रस्तुतस्तुतिघोषणः। [१२६].
Ep. Ind., Vol. XVIII, p. 238.

कोटांतील बावली (अथवा नकट्या रावळाची पायऱ्या असलेली विहीर) ब्राह्मणी राज्याची अथवा बेदरच्या राज्याची साक्ष देत आहे असा समज आहे. पण ती आदिलशाहींतील तरी निःसंशय आहे.

कऱ्हाड बेदरच्या म्हणजे ब्राह्मणी अथवा बहामनी राजांच्या अंमलाखालीं होतें. खटावास उपलब्ध झालेल्या एका टिपणावरून असें दिसतें कीं, शके १३१८ (इ० सन १३९६) पासून पुढें निदान बारा वर्षे किंवा तीस वर्षे पडलेला दुर्गादेवीचा दुष्काळ कऱ्हाडास व कऱ्हाड प्रांतासहि जाणवला. "विद्यानगरीहून (विजयनगराहून) दादो नरसीह (नरसिंह) अथर्ववेदी मालंजन गोत्री पा कराडास आला."[1] त्याचें उपनाम काळे होतें. साधारण वस्ती होती. मुलुख खराब झालेला पाहून तो बेदरच्या बादशहास[2] जाऊन भेटला. हकीगत सांगून आबादानीबद्दल "कारमुलकी पा कराड बावन चाहुडीचें करून आला."[3] याचा अर्थ असा कीं, मुलकी कारभारासाठीं कराड (कऱ्हाड) परगणा करून त्यांत बावन गांवें सामील करून आला. मुलुखांत कोणी वतनदार नव्हते. "चारणीस चारणकर आले होते, त्यांस वतनें करून दिल्हीं."[3] तेव्हां या सुमारास कऱ्हाड व त्याखालील बावन गांवें बेदरचे बादशहाच्या (ब्राह्मणी अथवा बहामनी राज्याच्या) सुलतान अहमदशहा वलीच्यातर्फे दादो नरसिंह काळ्याकडे मुलकी कारभारास होतींसें दिसतें. देशपांडेपणाचीं वतनें यानंतरचीं असणार.

आदिलशाहींत एकलासखानास कऱ्हाड वगैरे ठिकाणांचा मोकासा पांच वर्षे होता.[4] नंतर तो त्याचे मुलास झाला. पुढें आसतखान लाहारी हा मोकासाई खान होता. नंतर मोकासा अमानात होऊन आलमखान व मुस्तफाखान यांस कऱ्हाडप्रांत जहागीर मिळाला. "तंव मुकासा फिसका जाहला; अमानत

---

१. भा. इ. सं. मं. स्वीयग्रंथमाला, क्रमांक ३०, पृष्ठें ४–५.

२. या वेळीं सुलतान अहमदशहा वली गादीवर होता. Grant Duff's History of the Marāthās, 1912, Calcutta, Vol. I, p. 44.

३. भा. इ. सं. मं. स्वीयग्रंथमाला, क्रमांक ३०, पृष्ठें ४-५.

४. इतिहास व ऐतिहासिक वर्ष ३, अंक २८-३१, पृष्ठ ९९.

जायणा लिंगरस हवालदार व माहाराज राजेश्री शाहाजी राजे भोसले."[1] या वेळीं या प्रांतांचा अंमल पन्हाळ्याहून होत असेसें दिसतें. रा० ल. म. देशपांडे, एम्. एल्. सी., यांच्या पूर्वजांचा आदिलशाहींतील तारीख १ साबान सु॥ सबा खमसैन व आलफ (इंग्रजी तारीख ९ मे इ० सन १६५७)चा देशपांडे-वतनासंबंधींचा एक महजर इनाम कमिशननें नोंदिलेला आहे. क-हाड प्रांतांतील बावीस गांवची देशमुखी शहाजीस आदिलशहानें रणदुल्लाखानाचे हाताखालीं इ० सन १६३८–३९ तील मोहिमेंत उत्तम काम केल्याबद्दल जहागीर दिली. पुढें शहाजीराजे पादशहापासून यागी जाहले. मग क-हाडचा मोकासा प्रथम जुजारराव (झुंझारराव) घाडगे यांस, पुढें हजरत बडे-साहिबिणीस, नंतर आफजलखानास व पुढें अजीजखानास झाला.[2] इ० सन १६५३त क-हाडची देशमुखी बाजी घोरपड्यास बहाल करण्यांत आली.[3] आदिलशाहींतील इ०सन १६६१च्या जानेवारींत (दुसरा) अली आदिलशहा स्वतः फौज घेऊन शिवाजींचे सैन्याशीं लढण्यास आला.[4] विजापूरच्या सैन्याचा व मोरोपंत पिंगळ्यांच्या लष्कराचा सामना क-हाडास हल्लीं इदगा असलेल्या माळावर झाला. थोरले कैलासवासी स्वामींनीं (शिवछत्रपतींनीं) पन्हाळा घेतला. मुलुख अर्जानीं केला.[5]

विजापूरच्या बादशहाचा नायब सुभा क-हाड येथें रहात असे. विजापूरचे राज्यांतील व कांहीं इतर ठिकाणचे मक्केस जाणारे यात्रेकरू तेथें जमून पुढें कोंकणांत उतरून दाभोळ वगैरे ठिकाणीं बोटींत बसत. क-हाडचे पश्चिमेचे दरवाजास 'दाभोळ' दरवाजा म्हणत व म्हणतात. याच्या उलट दाभोळास ज्या दरवाजाचें तोंड क-हाडच्या बाजूस आहे त्यास अर्थात् तेथील पूर्व दरवाजास 'क-हाड दरवाजा' संबोधितात.

## मराठ्यांचा अम्मल.

" कसबे क-हाड ये स्थलीच्या ब्राह्मणांस पूर्वीं आदलशहाचे कारकीर्दीस

१. इतिहास आणि ऐतिहासिक, वर्ष ३, अंक २८–३१, पृष्ठ १०१.

२. इतिहास आणि ऐतिहासिक, वर्ष ३, अंक २८–३१, पृष्ठ १०४.

३. मराठी रियासत, पू. वि., पृष्ठ १५७.

4. Grant Duff's Marathās, Vol. I, pp. 145-6.

५ इतिहास आणि ऐतिहासिक, वर्ष ३, अंक २८–३१, पृष्ठ १०४.

कित्येक वृत्ति होत्या."[1] असा आम्हीं विविध-ज्ञान-विस्तारांत छापिलेल्या एका सनदेंत उल्लेख आहे. त्या वृत्ति काढून थोरल्या शिवछत्रपतींनीं ब्राह्मण पाहोन त्यांस धर्मादायाच्या मोईनी करून दिल्या. राजारामाच्या कारकीर्दींत पुन्हा शिवापूर (सैदापूर) हा गांव कऱ्हाडच्या ब्राह्मणांस अग्रहार करून देण्यांत आला.

वरील मासिकांतच आम्हीं छापिलेल्या थोरल्या छत्रपति राजारामाच्या अस्सल सनदेवरून शिवछत्रपतींनीं कऱ्हाडच्या प्रीति-संगमीं स्नान केल्याचें दिसून येतें. एवढ्याचकरितां कऱ्हाडच्या ब्राह्मणांस थोरल्या राजाराममहाराजांनीं व रामचंद्रपंत अमात्यानें सनदा देऊन दान दिलेल्या सैदापूरचें नांव 'शिवापूर'[2] ठेविलें. कोल्हापूरकर संभाजी छत्रपतींच्या विविध-ज्ञान-विस्तारांतच दिलेल्या अस्सल सनदेवरून कऱ्हाडचा विश्वनाथभट गिजरे शिवछत्रपतींचा तीर्थोपाध्याय होता हें सिद्ध झालें आहे.

त्यांच्या कारकीर्दींत कऱ्हाड कधीं त्यांच्याकडे असे तर केव्हां त्यावर आदिलशाही अंमल चाले. तरी त्यांच्या मृत्यूच्या वेळीं कऱ्हाड प्रांत त्यांच्या ताब्यांत होता; कारण कऱ्हाडाहून तीन मैल असलेल्या वसंतगड किल्ल्याची गणना सभासदी बखरींत त्यांनीं नवीन वसविलेल्या गडांत (किल्ल्यांत) केलेली आहे.[3] इतर कागदपत्रांवरूनहि हेंच सिद्ध होत आहे.

थोरल्या शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर त्यांचा सेनापति हंबीरराव मोहिते यानें कऱ्हाडच्या आसपासचे रस्ते संभाजी छत्रपतींच्या उलट रोखून धरिले होते.

थोरल्या राजाराम छत्रपतींच्या कारकीर्दींत ते जिंजीकडे असतां रामचंद्रपंत अमात्य कऱ्हाड वगैरे प्रांतांचा बंदोबस्त वसंतगड किल्ल्यावरून पहात असे व तेथून सनदा देत असे.

याच कारकीर्दींतील सुहुरसन समान तिसैन अलफ छ. २१ मोहरमच्या म्हणजे तारीख ३० जुलई इ० सन १६९७च्या रामचंद्रपंत पण्डित अमात्या-

१. विविधज्ञान-विस्तार, जून, १९२४–पृष्ठ २८९.

२. सह्यविचार, विशेषांक, एप्रिल, १९२७–पृष्ठ २०८.

३. कृष्णाजी अनंत सभासद विरचित, रा० ब० का. ना. साने, यांनीं प्रकाशित केलेलें शिवछत्रपतींचें चरित्र, आवृत्ति चौथी, पृष्ठ १००.

च्या सनदेवरून केलेल्या एका यादींत ज्या कऱ्हाडच्या ब्राह्मणांस सैदापूर (यासच आफळापूर व शिवापूर म्हणत) गांव अग्रहार देण्यांत आला, त्यांचीं उपनामें दिलेलीं आहेत. त्यांत गिजरे, ढवळीकर, गरुड वगैरे ३३ स्मार्तांचीं आडनांवें असून काळे, टोणपे वगैरे २१ वैष्णवांचीं आहेत. जांभळे, सरडे, वगैरे सहवासी म्हणजे ज्यांस सवाशे[1] म्हणतात त्यांचींहि उपनामें त्यांत आहेत.

तारीख ३१ आक्टोबर इ०सन १६९९ रोजीं औरंगजेबानें रामचंद्रपंतास, परशुरामपंत प्रतिनिधि आपणास सामील व्हावा म्हणून पत्र लिहिलें[2] तें असें:—"रामचंद्रपंत यानें जाणावें कीं, सुदैवानें दूरवर विचार करून तुम्हीं शुभमुहूर्तावर तर्बियतखान (तोफखान्यावरील अम्मलदार) यांस पत्र लिहिलें तें आम्हीं वाचलें. त्यांतील सर्व प्रकार आम्हांस कबूल आहेत. त्यावरून आम्ही असें फर्माविता कीं, भरंवशाचा व निष्ठेचा जो सन्मार्ग तुम्हीं धरिला आहे, तो कायम ठेवा, लिहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी त्वरेनें करून दाखवा आणि त्या दुष्टाचा (राजारामाचा) आश्रय सोडून द्या. त्या दुष्टाच्या नश्वर आयुष्याचे जर अजून कांहीं क्षण बाकी असून, आमच्या फौजेस भिऊन पळून जाण्याची त्यास इच्छा होईल, तर तुम्हींच सर्व किल्ले आमच्या हवालीं करावे हें योग्य आहे. परमेश्वरानें तुम्हांस बुद्धि देऊन दोनहि गोष्टी केल्यात म्हणजे तुमचा उत्कृष्ट सन्मान करून, तुम्हांस उत्तमोत्तम बक्षिसें व मनसब देऊं; परंतु दुर्दैवानें आपलें नफा-नुकसान काय हें जर तुम्हांस कळलें नाहीं, आणि तुमच्या पत्रांतील शब्द सर्व फोल असतील, तर मग तुम्ही व तुमचा राजा ह्यांस काय दिसायचें तें दिसेल. मुलांमाणसांसुद्धां तुमचीं सर्वांचीं डोकीं कापलीं जातील. कळावें." रामचंद्रपंत शत्रूस सामील नव्हता; पण तो त्यांस मिळाला आहे असें भासविण्यासाठीं हें पत्र लिहिलेलें होतें व हें परशुरामपंताच्या हातीं पडावें अशी व्यवस्था युक्तीनें औरंगजेबानें केली होती. पुढें

---

१. रा० कृ. वि. आचार्य, भा०इ०सं०मं० अहवाल, शके १८१८, पृष्ठें १४१–१४२.

२. मराठी रियासत, पूर्वविभाग, पृष्ठ ६८५.

वसंतगड किल्ला ता २९ नोव्हेंबर इ०सन १६९९ रोजीं[1] त्यानें काबीज केला. तेव्हां कऱ्हाड प्रांत सहजच त्याचे हातीं आला. पण तो पुन्हा लवकरच मराठ्यांनीं घेतला.

शके १६२२ विक्रमनाम संवत्सरपर्यंत कऱ्हाडास बरेंच धार्मिक महत्त्व असून दक्षिण काशीचें तें 'शक्तिक्षेत्र, मुक्तिक्षेत्र, सुवर्णकर क्षेत्र' समजलें जाई असें त्या वर्षीच्या भाद्रपद वा त्रयोदशी शुक्रवारीं[2] दिलेल्या एका सनदेवरून सिद्ध होतें. हींत संगमास कृष्णा-ककुद्मती-प्रीतिसंगम म्हटलें आहे. आम्हीं विविध-ज्ञान-विस्तार, १९२४, पृष्ठें २८९–२९२ वर छापिलेल्या व रा० गिजऱ्यांस दिलेल्या सनदेंतहि नद्यांचीं नांवें कृष्णा-ककुद्मती अशींच आहेत; कृष्णा हें नांव तर कायमच आहे. पण वरील दोन सनदांवरून कोयनेस 'ककुद्मती' संबोधीत हें विशद होतें. कोयनेस ककुद्मती कधींपासून म्हणूं लागले हें नक्की कळत नाहीं; पण वरील कृष्णामाहात्म्यांत तिचें नांव 'ककुद्मती'च आहे. शके १६२२च्या सनदेंत कऱ्हाडचा उल्लेख 'कऱ्हाटक' असा आला आहे.

इ० सन १७००पुढें व १७१७पर्यंत कऱ्हाड प्रांतावर पुन्हा मोगलांचा ताबा होता. सुरवातीचें वर्ष समजण्यास साधन नाहीं. पण इ० सन १७०६त औरंगजेबाचा अम्मल कऱ्हाडवर होता. [पुढें पृष्ठ ५३ पहा.] १७१७त मोगलांचा अंमलदार पडदुल्लाखान तेथें रहात असे, त्यास शाहूछत्रपतींनीं बाळाजी विश्वनाथास घेऊन धालवून दिलें व गांव काबीज केला. त्याच्या वंशजांचा पत्ता लागत नाहीं.

वारणेच्या तहापूर्वी शके १६५२च्या फाल्गुन शुद्ध तृतीयेस (तारीख २८ फेब्रुवारी इ० सन १७३१ रोजीं) सातारकर छत्रपति थोरले शाहू महाराज व कोल्हापूरकर छत्रपति संभाजी महाराज यांच्या भेटी सुवर्णपुष्पें व रौप्यपुष्पें यांची वृष्टि करवून मोठ्या थाटानें झाल्या. दोन्ही छत्रपति एका अंबारींत बसून

१. मराठी रियासत, पूर्वविभाग, पृष्ठ ६८३.

२. तारीख ३० ऑगस्ट इ०सन १७००.

बोलणीं झालीं. संभाजी महाराजांस ते बसले होते तो हत्ती[1] व दोन घोडे शाहूमहाराजांनीं दिले. सुवर्णाचें सामान वगैरेहि त्यांस अर्पण करण्यांत आलें.

थोरल्या शाहू छत्रपतींच्या कारकीर्दींत कऱ्हाडचा मुलूख श्रीमंत पंत-प्रतिनिधींच्या ताब्यांत होता. कचेरी कोटांत असे. कऱ्हाड ही त्यांची राजधानी होती. प्रतिनिधींची पुष्कळ बाजू सरदार मुतालिक यांनींच सांभाळिलेली होती.

(दौलतराव) शिंदे व दुसरे बाजीराव पेशवे यांनीं इ० सन १८०९च्या सुमारास परशुराम श्रीनिवास प्रतिनिधि यांस ते पुण्यास असतां पकडण्याचा बेत केला. तेव्हां त्यांस चुकवून प्रतिनिधि पुण्याहून कऱ्हाडास पळून गेले. दुसरे बाजीराव साहेब इ० सन १८१८त पळत असतां[2] ता. २३ जान्युआरीस तेथें मुक्कामास होते. ब्रिटिशसरकारचें राज्य झालें तेव्हांहि कऱ्हाड व आस-पासचा भाग पंतप्रतिनिधींच्या ताब्यांत असून तालुक्याचें ठाणें कोटांत असे.

बहुधा थोरल्या शिवछत्रपतींच्या वेळेपासून ते प्रतापसिंहांच्या अमदानी-पर्यंत कऱ्हाडची देशमुखी यादवांच्याकडे होती. यांचे वंशज गोंवाऱ्यास हल्लीं आहेत. हे यादव आपणांस देवगिरीच्या यादवांचे वंशज समजतात व हे असावेतहि. अशी आख्यायिका आहे कीं, प्रतापसिंह महाराजांनीं यांच्या मुलीस मागणी घातली; पण आपणांस भोंसल्यापेक्षां उच्च वंशीय मानणाऱ्या या देशमुखांनीं हें तंट्याचें बीजच नाहींसें करण्यासाठीं तीस पोत्यांत घालून श्रीकृष्णा व कोयना यांच्या प्रीतिसंगमांत बुडवून मारिलें. याचा परिणाम असा झाला कीं, यादवांची देशमुखी खालसा करण्यांत आली. यांच्या पूर्वजांनीं थोरल्या शिवछत्रपतींस तोरणा किल्ला घेण्याच्या व बांधण्याच्या कामीं मदत केली होती. हल्लीं सोमवारपेठेंत शाळा नंबर १ची इमारत आहे ती यांचीच होती. शिवाय गुरुवार पेठेंत यांचा एक वाडा होता. तो अलीकडे विकण्यांत आला.

प्रतापसिंह महाराजांच्या कारकीर्दींत बाळासाहेब चिटणिसांचे हस्तक वैद्य यांच्याकडे कऱ्हाड जवळच्या वसंतगड किल्ल्याची कारखानिशी होती.

---

१. कै० रा० ब० का. ना. साने, यांनीं संपादिलेलें मल्हार रामराव चिटणीस विरचित थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र, आवृत्ति तिसरी, पृष्ठें ८६–८७.

२. मुंबई गॅझीटीअर, सातारा, पृष्ठ ४८०.

त्यांचे वंशज रा० शंकरराव वैद्य नाशिक जिल्ह्यांत न्यायखात्यांत नोकर आहेत.

इ० सन १८९९ सालीं कऱ्हाडचा मोबदला होऊन तें इंग्रज सरकारच्या राज्यांत सामील झालें. इ० सन १८८९ पर्यंत पंतांची कचेरी कोटांत होती. ती त्या सालीं कुंडलास गेली.

## इंग्रजी अमदानी.

हल्लीं कऱ्हाड, सातारा जिल्ह्याच्या कऱ्हाड तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. तेथें सब्-जज्जांचें कोर्ट, दवाखाना, मामलेदार व सब्-रजिस्ट्रार यांच्या मोठ्या कचेऱ्या असून दोन किंवा तीन पोलीस सब्-इन्स्पेक्टर असतात. कच्च्या कैद्यांच्या कोठड्या बऱ्याच असून त्या बहुधा भरलेल्या असतात.

हल्लीं कऱ्हाडास निदान पांच रस्ते मिळतात. ते:—पुणें–बेळगांव, कऱ्हाड–चिपळूण, कऱ्हाड–तासगांव, कऱ्हाड–विजापूर आणि कऱ्हाड–मसूर. खेरीज लोकलबोर्डाचे कऱ्हाड–कोळें वगैरे मार्ग आहेत ते निराळेच.

कऱ्हाडची म्युनिसिपॅलिटी इ०सन १८९९त स्थापन झाली. नळाचें पाणी गांवांत मे० सी. एन्. सेडनसाहेब, आय्. सी. एस्., कमिशनर असतां इ० सन १९१७त आणण्यांत आलें. पाणी आणण्याचा खर्च आजपर्यंत अजमासें २४९,०००[१] रुपये झाला आहे.

पेठा सात असून त्यांस वारांचीं नांवें आहेत.

कऱ्हाड सातारा जिल्ह्याचें खरें केंद्र असल्यामुळें एका वेळीं सब्-डिव्हिजनचें तें मुख्य ठिकाण करण्याचा विचार होता.

कऱ्हाडास शिक्षण-मंडळाचें "टिळक-हायस्कूल" इ०सन १९२१ सालीं स्थापन झालें. त्यांत इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत शिक्षण दिलें जातें. मॅट्रिक्युलेशन व गव्हर्नमेंट सर्व्हिस (सरकारी नोकरीची परीक्षा) अशा दोन्ही परीक्षेस मुलें बसतात. वरील संस्थेंत ३०० विद्यार्थी शिक्षण घेतात. तींत शिक्षक १४[२] आहेत. तीस धनिकांनीं व इतर लोकांनीं आतांपर्यंत

१. रा० लक्ष्मण महादेव देशपांडे, एम्. एल्. सी., यांनीं पुरविलेली माहिती.
२. रा० ना. ना. कुलकर्णी यांनीं दिलेली संख्या.

२९,०००[1] रुपये खर्चून इमारत बांधून दिलेली आहे. तीस गुदस्तां (इ०सन १९२८ सालीं) सरकारी ग्रँट १३५० रुपये मिळाली.

ज्यांत मराठी पूर्ण सातव्या इयत्तेपर्यंत शिक्षण मिळतें अशा दोन शाळा असून त्यांत ९३९ मुलें व ३२[2] शिक्षक आहेत. अंत्यजांच्या शाळेंत २७ मुलें असून १ शिक्षक आहे. मुलींच्या शाळेंत ४२९[2] मुली असून त्यांत १४ शिक्षकिणी आहेत.

उर्दू शाळा दोन आहेत. एक मुलांची असून तींत २०० विद्यार्थी व ८ शिक्षक आहेत. दुसरी मुलींची असून तींत ९५ विद्यार्थिनी व २ शिक्षकिणी आहेत.

वरील मदत असलेल्या ( aided ) दवाखान्यांत इ०सन१९२७सालीं ६३ आंत राहणाऱ्या व १०,३१९ बाहेर राहणाऱ्या रोग्यांस औषधोपचार करण्यांत आले.[3] खेरीज सात इंग्रजी पद्धतीचे व पांच आयुर्वेदिक दवाखाने आहेत ते निराळेच.

तीन फोटोग्राफरचीं दुकानें आहेत. पैकीं एकांत चित्रकलेचेंहि (कला-कौशल्याचेंहि) काम केलें जातें.

छापखाने चार आहेत:—१ भुवनेश्वरी, २ लोकमान्य, ३ सुमंत, व ४ लक्ष्मी ह्या नांवांनीं ते संबोधिले जातात.

भुईमुगांच्या शेंगांचा मोठा व्यापार ४—५ महिने कऱ्हाडास चालतो. रॅली ब्रदर्स व व्हॉलकार्ट ब्रदर्स यांच्या शाखा त्या वेळीं तेथें जातात.

हल्लीं मुसलमान लोकांत कच्छी सधन असून व्यापारांत त्यांचा हात-खंडा आहे. मात्र अगदीं अलीकडेच त्यांची वस्ती वाढली आहे. पन्याचा, सुताचा व किराण्या जिनसांचा व्यापार मुख्यत्वें ते करितात. त्यांची लोक-संख्या सुमारें १५०—२०० आहे.

---

१. सुपरिंटेंडेंट, टिळक-हायस्कूल, यांनीं पुरविलेली माहिती.

२. रा० ना. ना. कुलकर्णी यांनीं दिलेली संख्या.

३. मे० सिव्हिल सर्जन, सातारा, यांनीं मि० डोसाभाई माणिकजी वकील, यांच्यामार्फत पाठविलेले आंकडे.

कऱ्हाडची लोकसंख्या इ० सन १९२०-२१ सालीं खानेसुमारींत १०,२४३ भरली. पैकीं ८,१७२ हिंदू असून त्यांत ४,१७८ पुरुष व ३,९९४ स्त्रिया होत्या. जैन १२२ पुरुष व ८४ बायका होत्या. मुसलमान १८६९ भरले. त्यांत ९६८ पुरुष व ८९७ स्त्रिया होत्या.

कऱ्हाडपासून तीन मैलांवर ओगलेवाडीस कांचकामाचा मोठा कारखाना आहे. ओगले बंधु या कामांत तरबेज असून त्यांतील एक रा० गुरुनाथ प्रभाकर ओगले, परदेशांत जाऊन त्यांनीं "प्रभाकर" नांवाचा डीइट्झच्या धर्तीचा पण त्यांतहि सुधारणा केलेला कंदील काढिला आहे. त्यांच्या कारखान्याचा माल कऱ्हाडासच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत खपतो.

सुमारें २२०० वर्षे अनेक राज्यांचा, राज्य-क्रान्त्यांचा, धार्मिक उलाढालींचा व कारागिऱ्यांचा इतिहास पटविणाऱ्या कऱ्हाडची ही अशी थोडक्यांत हकीगत आहे.

---

# कऱ्हाडांतील साध्वी स्त्रिया.

## १ संत सखूबाई.

या साध्वीची कीर्ति कऱ्हाडांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत अजरामर होऊन राहिलेली आहे. सिनेमांत हिचीं चित्रें दाखविण्यांत येतात. पण हिच्या वावरत्या पुण्यस्थानांचें दर्शन व्हावें म्हणून हिच्या देवळाचें अर्थात् घागर ठेविली त्या स्थानाचें छायाचित्र दिलेलें आहे. [छायाचित्र क्रमांक ७ पहा.] ही गिजरे घराण्यांतील होती असें म्हणतात. कांहीं सांगतात कीं, ही लाटकर कुळांत जन्मास आली. या साध्वीस फार सासुरवास होता. तो सहन करवेना म्हणून ही एका दिंडी बरोबर पाण्याची घागर श्रीकृष्णेच्या कांठीं टाकून पंढरपुरास गेली. हिनें जेथें घागर ठेविली होती तेथेंच विठोबा रखमाईचें देऊळ बांधण्यांत आलें व ही ज्या घाटानें नदीवर उतरून गेली तोच हिच्या देवालयासाठीं दुरुस्त करण्यांत आला. ही पंढरीस गेल्यावर श्रीविठोबानें हिचें सोंग घेऊन कांहीं काळ हिच्या

घरांत काम केलें अशी आख्यायिका आहे. पंढरीस हिनें श्रीपांडुरंगाच्या चरणीं डोई ठेवतांच हिचा प्राण निघून गेला; नंतर हीस दहन करण्यांत आलें.

## २. अक्काबाई.

श्रीसमर्थशिष्या अक्काबाई ही कऱ्हाडकर देशपांडे रुद्राजीपंत यांची कन्या होती. ही बालविधवा होती. हिनें रामदासस्वामींचा अनुग्रह घेतला. हिच्या अंगीं कवित्व होतें. ही स्वामींची एकनिष्ठपणें सेवा करीत असे. हिनें व कल्याणस्वामींनीं श्रीसमर्थांचें सज्जनगडावरील राममंदीर बांधिलें. हिचा बराच काळ तेथेंच गेला. श्रीसमर्थांच्यामागें ४० वर्षे ही होती. हिची अगदीं साधी समाधि[1] सज्जनगडीं आहे.

---

# कऱ्हाडांतील कांहीं ऐतिहासिक घराणीं.

## हिंदु कुलें.

देशपांडे—१ कऱ्हाडकर, २ वांईकर व ३ कडेगांवकर अशीं तीन देशपांड्यांचीं घराणीं कऱ्हाडास मुसलमानी अमलापासून सुप्रसिद्ध आहेत. रा० लक्ष्मणराव देशपांडे, एम्. एल्. सी., यांचा पूर्वज काशीपंत ऊर्फ द्यानतराव विजापुरच्या आदिलशाहींत प्रधान होता. त्याचा वंशविस्तार आम्हीं सहविचारांत[2] दिला आहे. श्रीसमर्थशिष्या अक्काबाई या घराण्यांतील रुद्राजी चंदोची कन्या होती हें वर आलेंच आहे. त्याचें नांव शके १५९७ माघ बहुल त्रयोदशीच्या (१ फेब्रुआरी इ० सन १६७६च्या) पालीच्या महजरांत आलेलें असून त्यांत त्याचा उल्लेख "देशकुलकर्णी पा मजकूर (कऱ्हाड) व सरदेशकुलकर्णी महालानिहाय" असा आला[3] आहे.

रामरामे, रामरामी अथवा रामनामे—हे कऱ्हाडचे कुलकर्णी आदिल-

---

१. आमची परळीची यात्रा, पृष्ठ १७.

२. सहविचार, वर्ष ५, पृष्ठ २६.

३. रामदास आणि रामदासी, वर्ष ६, अंक ६३-६४, पृष्ठ २४.

शाहीपासून प्रसिद्ध आहेत. यांचे ऐतिहासिक कागद, इतिहास व ऐतिहासिक, वर्ष ३, अंक २८–३१, पृष्ठें ९९–१०५ यांवर छापिलेले आहेत. यांचा रा० डुबल यांचे येथें असलेला एक शिवकालीन शिलालेख वर आलाच आहे. [पृष्ठ १४ पहा.] यांचेकडे डुबल व देशपांडे यांचीं वतनें आलीं होतीं, तीं त्यांनीं सोडवून घेतलीं.

**बटाणे**—हें घराणें थोरल्या शिवछत्रपतींच्या वेळेपासून तरी कऱ्हाडास असावें. याच्याकडे देशचौगुलेपणाचें वतन कांहीं काल आलेलें होतें. तें डुबलांनीं भांडून परत घेतलें. बटाणे घराणें लिंगाईत असून यांतील पुरुषांचीं शिवलिंगें श्रीकृष्णेच्या कांठीं आहेत.

**डुबल ऊर्फ साळुंखे**—हें घराणें अस्सल क्षत्रिय असून आदिलशाहीच्या अगोदरपासून सुप्रसिद्ध आहे. या डुबलांची कांहीं माहिती आम्हीं सहविचारांत[1] दिली आहे. शिवाजी डुबल शिवकालीन होता. पालीच्या महजरांत याचें नांव महाजनांत[2] सांपडतें. त्यांत याचें आडनांव इबाल पडलें आहे. "इबाल" ही डुबलाच्या ऐवजीं झालेली मोडी वाचनाची चुकी होय. या डुबलांकडे देशचौगुलेपणाचें पूर्वापार वतन होतें. तें रामरामी यांनीं बळकाविलें होतें. तें त्यांचे त्यांस पुढें चौकशी करून छत्रपतींनीं देवविलें. मिरजेचा किल्ला बाळोजी डुबल ऊर्फ साळुंखे याजकडे होता. शाहू छत्रपतींची स्त्री सकवारबाई हिचें व याचें नातें होतें. राजकीयदृष्ट्या तो किल्ला त्याजकडे ठेवणें इष्ट नसल्यामुळें तो त्याचेकडून काढून सदाशिवराव भाऊनें शिवाजी बल्लाळ जोशी यास दिला.[3] हा बाळोजी इ० सन १७४६च्या सुमारास वारला. याची समाधि कऱ्हाडास श्रीकृष्णेच्या कांठीं आहे. तिच्यापुढें याचा पुत्र शिवाजी व नातू नाथाजी यांच्या समाध्या आहेत.

---

१. ऐतिहासिक माहिती, डुबल व रा० गो. स. सरदेसाई, वर्ष ४, अंक ३, पृष्ठें १०५–१०६.

२. रामदास आणि रामदासी, वर्ष ६, अंक ६३–६४, पृष्ठ २४.

३. मराठी रियासत–मध्यविभाग १, आवृत्ति दुसरी, पृष्ठ ३२५.

**गिजरे**—हें एक सुप्रसिद्ध घराणें असून याच्या शाखा अनेक आहेत. एकींतील विश्वनाथभट थोरल्या शिवछत्रपतींचा तीर्थोपाध्याय होता हें वर आलेंच आहे. या कुलांत आदिलशाहीपासूनचे अस्सल कागद पहावयास मिळतात.

**ढवळीकर**—हेंहि एक प्राचीन घराणें आहे.

**देशमुख—यादव**—या घराण्याकडे शिवछत्रपतींच्या वेळेपासून ते प्रतापसिंहमहाराजांपर्यंत कऱ्हाडची देशमुखी असावीसें दिसतें. हे देशमुख देवगिरीच्या यादवांचे वंशज म्हणून आपणांस म्हणवितात. हे उच्च कुलांतलि आहेत यांत संदेह नाहीं. तोरणा किल्ला घेण्याच्या व बांधण्याच्या कामीं या घराण्याचा शिवछत्रपतींस उपयोग झालेला आहे. ह्या घराण्यांत कांहीं महत्त्वाचे ऐतिहासिक कागद आहेत; पण ते हातीं येणें कठीणच दिसतें.

## मुसलमानी घराणीं.

**काजीसाहेब**—यांचा मूळ पुरुष अल्ली अजगरशहा. हेंहि घराणें आदिलशाहीपासून सुप्रसिद्ध आहे. अल्ली अजगरशहाचे वंशज शुक्रवार पेठेंत काजीवाड्यांत राहतात. यांचेजवळ आदिलशाहींतील दोन पेटारे भरून कागद आहेत.

**खतीबसाहेब**—यांचा मूळ पुरुष शेख महंमद हुसेन वा शेख महंमद अल्ली. हें घराणें निदान औरंगजेबाचे वेळेपासून प्रसिद्ध आहे. या कुलांत त्या वेळचे कांहीं अस्सल कागद आहेत. मूळ खतीबास औरंगजेबानें तारीख २ शव्वाल हिजरी सन १११७ (इंग्रजी ता ७ फेब्रुआरी इ० सन १७०६) रोजीं दिलेली सनद आज अस्तित्वांत आहे. खतीबांचे जमिनीस अद्यापि खतीबी म्हणतात.

**मुतवल्ली**—मुतवल्ली म्हणजे वहिवाटदार. मंगळवारांत मौलालीचा दर्गा असल्याचें वर आलेंच आहे. या दर्ग्याच्या आदिलशाहीपासूनच्या वहिवाटदारांस मुतवल्ली म्हणतात.

**मुजावर**—मुजावर म्हणजे पूजा करणारा. मुजावर संबोधिलीं जाणारीं कऱ्हाडास दोन घराणीं आहेत:—[१] मौलालीच्या दर्ग्याचे मुजावर व [२] ख्वाजा खिजरच्या दर्ग्याचे मुजावर. या दुसऱ्या घराण्यांत दिवाबत्तीस वगैरे दिलेले आदिलशाही अंमलदारांचे हुकूम पहावयास मिळतात.

**मुल्ला**—कऱ्हाडच्या जाम-इ-मसजिदीच्या आदिलशाहीच्या वेळच्या मुल्लांचे वंशज आहेत. या घराण्यास त्या वेळेपासून झाडलोट करणें, दिवाबत्ती करणें व वजूचें पाणी नमाजी लोकांस देणें या कामासाठीं इनाम जमीन आहे. तीस मुल्लाणकी म्हणतात.

संपूर्ण